www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



रायगडमधील ४ हजार हेक्टर वरील फळबागेला पुनर्लागवडीची प्रतीक्षा
पान ३ वर....


दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




सोलापूर जिल्हा बँक घोटाळ्याची ३२ तत्कालीन संचालकांवर जबाबदारी
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १६३ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, सोमवार,११ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# निवडणूकीचे काम नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

## जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांचा इशारा

● ठाणे, सुचित शिंदे :

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीची मतदान प्रक्रिया येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडणार आहे. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून ही मतदान प्रक्रिया पार पाडण्याकामी विविध शासकीय, निमशासकीय आस्थापनांतील अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. परंतु अनेकजण निवडणुकीचे काम नाकारण्यात धन्यता मानीत असल्याचे तसेच कामात टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य मानले जाते. पाच वर्षातून एकदा होणाऱ्या निवडणुकीतील या राष्ट्रीय कर्तव्यास नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.





मा. भारत निवडणूक आयोगामार्फत विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर रोजी २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे तसेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण ६ हजार ९५५ मतदान केंद्रे असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण ७ हजार ७१७ मतदान केंद्राध्यक्ष, ७ हजार ७१७ मतदान अधिकारी १५ हजार ४३४ इतर मतदान अधिकारी अशा एकूण ३० हजार ८६८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण देखील पूर्ण झालेले आहे. परंतु अनेक कर्मचारी त्यांना प्राप्त झालेले निवडणूक कर्तव्य आदेश रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच यासाठी अनेक जण विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या शिफारशी घेवून तसेच आजारपणाचा दाखला घेवूनही मोठ्या प्रमाणावर येत असल्याची बाब समोर आली आहे. ज्यांच्या आरोग्यविषयक अडचणी खऱ्या आहेत त्यांच्याबाबतीत प्रशासनाने सहकार्याची भूमिका घेतली आहे.

तथापि निवडणूक प्रक्रिया पार पडण्यासाठी मनुष्यबळाची नितांत आवश्यकता असून कर्मचाऱ्यांकडून अशा पध्दतीचे वर्तन अपेक्षित नसल्याचेही जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले आहे.

निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून अशा प्रकारे जे कर्मचारी निवडणुकीसाठी त्यांना प्राप्त झालेले आदेश नाकारतील, निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील अथवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील त्यांच्यावर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे



कलम १३४ नुसार थेट कारवाई करावी, असे निर्देश ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जिल्हा निवडणूक कार्यालयामार्फत देण्यात आले आहेत.

# माथेरानच्या राणीचा 'विस्टाडोम' विनाच प्रवास

● माथेरान, धनश्री सट्टा :

माथेरानची राणी अर्थात 'मिनी ट्रेन'ला विस्टाडोम डबा जोडला नसल्याने पर्यटकांच्या आनंदावर विरजण पडले. बुधवारपासून माथेरानच्या राणीची सफर सुरू झाली. मिनी ट्रेनला 'विस्टाडोम' डबा जोडला जाईल, अशी अपेक्षा होती. त्यामुळे पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, प्रत्यक्षात 'विस्टाडोम' डब्याविनाच मिनी ट्रेनचा प्रवास सुरू झाल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

मध्य रेल्वेची ११७ वर्षांची नेरळ-माथेरान मिनी टॉय ट्रेन



भारतातील पर्वतीय रेल्वेपैकी एक आहे. त्यामुळे या ट्रेनमधून प्रवास करण्यासाठी पर्यटकांची गर्दी होते. तसेच २०१९ मध्ये नेरळ-माथेरान मिनी ट्रेनच्या विस्टाडोम डब्याचे लोकार्पण केले. विस्टाडोम डबा जोडल्याने, पर्यटक अधिक मिनी ट्रेनकडे ओढले गेले.


पान २ वर

# मनोज जरांगेंनी मराठा आरक्षणासाठी उपोषणाचा पॅटर्न बदलला

## १ लाख लोकांसह सामूहिक उपोषण, कुणाला पाडायचं हे सांगितलं

● बीड, सचिन कदम :

विधानसभा निवडणुकीच्या रिंगणातून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माघार घेण्याची घोषणा केली होती. फक्त एका जातीच्या बळावर निवडून येणे शक्य नाही. त्यामुळे आता मराठा समाजाने आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना निवडणुकीत पाडावे, असा आदेश जरांगे पाटील यांनी दिला होता. यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारपासून बीड जिल्ह्यातून दौऱ्याला सुरुवात केलीय. गेवराई तालुक्यातील त्वरिता देवीचे दर्शन घेऊन जरांगे पाटलांच्या दौऱ्याला सुरुवात झाली. अशातच मनोज जरांगे पाटलांच्या उपस्थितीमध्ये आज गेवराईमध्ये समर्थकाचे संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास्थळी बोलताना मनोज जरांगे पाटील



पुन्हा मोठे उपोषण सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे.

विविध मागण्यांसाठी मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मोठे उपोषण सुरू करणार आहे. या उपोषणामध्ये एक लाखाहून अधिक लोक सहभागी होणार असल्याचा दावा करण्यात आलाय. तर उपोषणाला येत असताना समाज बांधवांनी आपल्याला आवश्यक असणारे सर्व साहित्य घेऊन यावे, तसेच विशेष करून येत असताना अंथरणे व पांघरण्यासाठी कपडे देखील घेऊन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सरकारची झोप उडवण्यासाठी आता मराठा समाजाने पुन्हा एकत्र येण्याची गरज आहे. यांना मराठा समाजाचा काय हिसका आहे ते दाखवूनच देऊ, उपोषणासारखी ताकद कोणत्याही आंदोलनामध्ये नाही.

पान २ वर

# जेलमध्ये बसून अमेरिका-रशियात दहशत

● मुंबई, यश सावंत :

अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या आणि बॉलिवूड अभिनेता सलमान खानला धमकी दिल्याप्रकरणी लॉरेन्स बिश्नोईचं नाव पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. एनआयएच्या तपासात लॉरेन्स गँगच्या शूटर्सबाबत खळबळजनक खुलासे झाले आहेत. जेलमध्ये असलेल्या गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईच्या सूचनेनुसार टार्गेट लॉक केलं जातं आणि संधी मिळताच त्याला संपवलं जातं असं एनआयएच्या तपासात समोर आलं आहे. लॉरेन्सच्या सांगण्यावरून रक्तरंजित खेळ खेळणारे खतरनाक लोक देशभर पसरले आहेत.

पान २ वर



लॉरेन्स बिश्नोई गँगच्या शुटर्सबाबत खळबळजनक खुलासा

# दीड एकरात शिवरायांचं भव्य मंदिर, शिवमूर्तीचं अयोध्या कनेक्शन; महाराष्ट्रात उभारतंय पहिलं देऊळ

● ठाणे, रोहित जैसवार :

शिवसेना युबीटी प्रमुख उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्रातील जाहीर सभांमधून राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आल्यास छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारणार असल्याची घोषणा केली. विशेष म्हणजे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आपण शिवरायांचे मंदिर बांधणार असल्याची घोषणा उद्धव ठाकरेंनी केली. मात्र, याची सुरुवात ठाणे जिल्ह्यातून झाल्याचं पाहायला मिळत आहे. भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य मंदिर उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले



आहे. शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजूभाऊ चौधरी आणि साईनाथ चौधरी यांच्या अथक प्रयत्नातून, सुमारे दीड एकर परिसरात या मंदिराची निर्मिती होत आहे. मंदिराचे ८० ते ९० टक्के काम पूर्ण झाले असून, पुढील वर्षी शिवजयंती किंवा शिवराज्याभिषेक दिनापर्यंत हे ऐतिहासिक कार्य पूर्ण होणार आहे.

भिवंडीतील हे शिवमंदिर विशेष आकर्षणाचे केंद्र ठरत आहे, कारण मंदिरातील छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचे शिल्पकार असलेल्या शिल्पकारानेच साकारली आहे. या मूर्तीचे असामान्य सौंदर्य आणि ताकद पाहून शिवभक्त भारावून जातात. राजूभाऊ चौधरी यांनी सांगितले की, राज्यभरात शिवरायांचे अनेक पुतळे उभारले गेले असले, तरी त्यांची योग्य निगा न राखल्याने नुकसान होत आहे. त्यामुळे महाराजांचे मंदिर उभारून योग्य देखभाल होईल, तसेच शिवभक्तांना प्रेरणादायी वातावरण मिळेल, अशी त्यांची अपेक्षा आहे.

मंदिराची रचना देखील अत्यंत भव्य असून संपूर्ण किल्ल्याच्या प्रतिकृतीच्या स्वरूपात आहे. सुमारे ६० ते ६५ फूट उंच असलेले हे मंदिर भविष्यातील ३०० ते ४०० वर्षे टिकेल, यासाठी मजबुतीच्या दृष्टीने बांधले जात आहे. चारही बाजूला भक्कम तटबंध, भव्य महादरवाजा आणि सुंदर शिल्पकलेने सजलेले हे मंदिर शिवप्रेमींसाठी विशेष आकर्षणाचा ठरले आहे. मंदिर परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित घटनांचे चित्रण साकारण्यात आले असून शिवचरित्र भावी पिढीपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात शिवमंदिर उभारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. "सत्तेत आलो तर महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारू," असे त्यांनी जाहीर केले आहे.

# महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध





■ मविआच्या जाहिरनाम्यात महिलांना वर्षाला ५०० रुपयात ६ सिलेंडर, २.५ लाख सरकारी रिक्त पदांची भरती, कंत्राटी भरती बंद, १०० युनिट मोफत वीज.

■ शेतकरी, महिला सुरक्षा व सक्षमीकरण, नवीन उद्योग धोरण, रस्ते, दिवसा वीज, तंटामुक्त गाव, नोकर भरती, शिष्यवृत्तीत वाढ, युवा आयोग बनवणार.

● मुंबई, विशाल पाटील

महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी महाविकास आघाडीच्या महाराष्ट्रनामा या जाहिरनाम्याचे हॉटेल ट्रायडंट मधील भव्य पत्रकार परिषदेत प्रकाशन करण्यात आले. मविआ सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसात काय कामे करणावर व पाच वर्षांत काय काम करणार हे या जाहीरनाम्यात सविस्तर मांडण्यात आले आहे.

पान २ वर

# मिरा रोड येथे भाजी विक्रेत्याची गळा चिरून हत्या

● मीरारोड, विशाल कारंडे :



मिरा रोड येथे एका भाजी विक्रेत्याची गळा चिरून हत्या करण्यात आली आहे. मोहम्मद यार (२३) असे या मृत तरुणाचे नाव आहे. मिरा रोडच्या नया नगर येथे मोहम्मद यार हा तरुण रस्त्यावर भाजी विक्रीचा व्यवसाय करतो. याच परिसरात असलेल्या ऑर्चिड अपार्टमेंटजवळ तो मित्रांसोबत दुकानात राहत होता. मोहम्मद यार हा एक महिन्यांपूर्वीच उत्तरप्रदेशातून कामासाठी आला होता. शनिवारी रात्री सातच्या सुमारास इमारतीच्या सामूहिक शौचालयामध्ये त्याचा रक्तबंबाळ अवस्थेत असलेला मृतदेह आढळला. गळा चिरून त्याची हत्या करण्यात आली होती. त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मुंबईच्या जे. जे रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी नया नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोकण मार्गावरील एक्सप्रेसला जोडले जाणार एलएचबी डबे

● मुंबई, दिगंबर जाधव :

पश्चिम, मध्य, कोकण आणि दक्षिण भारतातील रेल्वे मार्गावरून धावणारी गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसला नव्या धाटणीचे लिंके हॉफमॅन बुश (एलएचबी) डबे जोडले जाणार आहेत. त्यामुळे डब्यांची वाढविण्यात आलेली लांबी आणि रूंदी, मोठे प्रवेशद्वार, सुधारित रचनेचे बेसीन आणि शौचालय अशा बदललेल्या रुपातील गाड्या आणि त्यातही वाढलेला वेग यामुळे गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या कोकणवासियांचा प्रवास अधिक सुखकर आणि आरामदायी होणार आहे.

गेल्या ३२ वर्षांपासून भारताच्या पश्चिम किनारपट्टीच्या रेल्वे मार्गावरून गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसचा प्रवास होत आहे. गांधीधाम-नागरकोइल साप्ताहिक एक्स्प्रेस ही दक्षिण रेल्वे क्षेत्राशी संबंधित एक्स्प्रेस आहे. पश्चिम रेल्वेवरील गांधीधामवरून या एक्स्प्रेसची सेवा सुरू होऊन, दक्षिण रेल्वेच्या नागरकोइल या स्थानकापर्यंत धावते. ही एक्स्प्रेस गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ आणि तमिळनाडू या पाच राज्यातून २,३४१ किमी



प्रवास करते. या राज्यातील ५५ स्थानकांवर ही एक्स्प्रेस थांबा घेते. महाराष्ट्रात बोईसर, वसई रोड, भिवंडी रोड, पनवेल, माणगाव, चिपळूण, रत्नागिरी, सावंतवाडी रोड या स्थानकात थांबते. कोकणातील रेल्वे स्थानकात थांबत असल्याने, कोकणवासियांसाठी ही एक महत्त्वाची रेल्वेगाडी आहे. त्यामुळे पारंपरिक पद्धतीचे निळ्या रंगातील डब्या ऐवजी लाल-करडा अशा रंगात एक्स्प्रेस असेल. कोकणवासियांना नव्या स्वरूपातील एक्स्प्रेसचा अनुभव घेता येणार आहे.

रेल्वे मंत्रालयाने देशभरातील सर्वच रेल्वेगाड्यांना एलएचबी डबे जोडण्याचा निर्णय घेतला होता. या एलएचबी डब्यामुळे एखादा अपघात झाल्यास जीवितहानी कमी होते. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत भर पडते. तसेच रेल्वेगाड्यांचा वेगही वाढवण्यास मदत होते.

पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

### रिल्सच्या मायावी गुंत्यात हरवलेल्या ‘वुमनिया’


शहरी महिलांपेक्षा ग्रामीण भागातील अशिक्षित महिला रिल्स, व्हिडीओ बनवण्यात बऱ्याच पुढे गेलेल्या आहेत. यामुळे अनेक वेळा आपल्याला प्रश्नही पडतो की या जे काही या रिल्स आणि व्हिडीओमध्ये करीत आहेत ते सगळं जग बघत आहे याचं भान किंवा ज्ञान तरी यांना असेल का? तर यांचं उत्तर हो असंच समोरून येतं. याचा अनुभव मी खुद्द घेतल्याने डोक्यावर हात मारून घेण्याची वेळ माझ्यावरच आली. प्रामुख्याने जेव्हापासून सोशल मीडियाच्या माध्यमातून पैसा कमावता येतो हे आपल्या जनतेला कळू लागलं आहे, तेव्हापासून गल्लोगल्लीत यूट्यूबर्स, इन्फ्लुएन्सर्सचे पेव फुटले आहे. खरंतर देशाला डिजिटल इंडिया करण्यामागचा सरकारचा हेतू अगदी प्रामाणिक होता, पण तो सवंगपणाच्या चिखलात रुतून बसता कामा नये. काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर पाण्याने भरलेल्या विहिरीत दोरीने बांधलेल्या खाटेवर बसून सासू आणि सून गरबा खेळत असल्याचे धक्कादायक व्हिडीओ व्हायरल झाले. विशेष म्हणजे आपण ज्या खाटेवर बसलोय ती पाण्याने भरलेल्या विहिरीच्या मध्यभागी असून जास्त झटके दिल्यास दोर तुटून ती थेट पाण्यात कोसळेल याची यत्किंचितही भीती या दोन्ही बायकांच्या चेहऱ्यावर नव्हती. त्या फक्त कॅमेऱ्याकडे बघून पोझ देत गरबा खेळण्यात दंग होत्या. कहर म्हणजे या व्हिडीओतली सूनबाई चक्क हेलकावे खाणाऱ्या खाटेवर उभी राहून नाचत होती. बघणाऱ्यांना मात्र या दोन्ही बायका कोणत्याही क्षणी दोरी तुटून विहिरीत पडतात की काय अशीच भीती वाटत होती, पण सासू-सून मात्र बिनधास्त. कुठून येत एवढं डेअरिंग यांच्यात देव जाणे, पण तुम्ही-आम्ही एवढा विचार करेपर्यंत त्या दोघींचा तो व्हिडीओ ४७ लाखांहून जास्त वेळा बघितला गेला.

७२ हजारांपेक्षा जास्त लाईक्सही त्याला मिळाले आणि अवघ्या काही वेळात २.१ लाख लोकांनी हा व्हिडीओ शेअरही केला होता. यामुळे या सासू-सुना देशातच नाही तर जगातही प्रसिद्ध झाल्या. गंमत म्हणजे सासू-सुनेचा हा व्हिडीओ एका तरुणाने काढला होता. त्याच्या इन्स्टाचे फॉलोअर्सही त्यामुळे बदाबदा वाढले. थोडक्यात देशातील कुठल्याशा राज्यातील कुठल्याशा गावातील या बायका काही क्षणातच ट्रेंडमध्ये आल्या. काही क्षणात लोकप्रिय झाल्या.

पण अशा पद्धतीने प्रसिद्ध होणाऱ्या या काही प्रथम महिला नसून सध्या देशात अशा प्रकारच्या नमुन्यांचा सुळसुळाट झाला आहे. यात टमरेलमधील, अंगणातील, कुंड्यातील झाडांना पाणी कसं द्यावं ते सकाळी चहाबरोबर खारी, बटर कसं बुडवून खावं, ते साडी कशी नेसावी, ती नेसून कसं बसावं, उठावं, चालावं यावर रिल्स बनवण्यापासून ते पतीदेवाच्या समक्षच भररस्त्यात लेकीबरोबर बीभत्स अश्लील नाच करण्याबरोबरच बेडरूममध्ये काय करावं हे सांगणारे रिल्स, व्हिडीओ बनवण्यापर्यंत या मध्यमवयीन महिलांची मजल गेली आहे. रिल्सच्या नादापायी काहींनी जीवही गमावला आहे, पण विशेष म्हणजे महिलांच्या या वेड्या चाळयांचे चाहतेही मिलियन्स, बिलियन्समध्ये वाढत असल्याने समाजाची सारासार विचारशक्ती किती दळभद्री होत चालली आहे याचं हे उत्तम उदाहरण आहे. एकीकडे महिलांवरील वाढत्या अत्याचाराविरोधात आवाज करायचा आणि दुसरीकडे याच महिलांनी इतक्या चिप पब्लिसिटीसाठी लाज, शरम बासनात गुंडाळत बीभत्स अंगविक्षेप करीत रिल्स व्हिडीओ बनवायचे याला काय म्हणायचं? बरं यात शहरी महिलांपेक्षा ग्रामीण भागातील अशिक्षित महिला रिल्स, व्हिडीओ बनवण्यात बऱ्याच पुढे गेलेल्या आहेत.

यामुळे अनेक वेळा आपल्याला प्रश्नही पडतो की या जे काही या रिल्स आणि व्हिडीओमध्ये करीत आहेत ते सगळं जग बघत आहे याचं भान किंवा ज्ञान तरी यांना असेल का? तर यांचं उत्तर हो असंच समोरून येतं. याचा अनुभव मी खुद्द घेतल्याने डोक्यावर हात मारून घेण्याची वेळ माझ्यावरच आली. प्रामुख्याने जेव्हापासून सोशल मीडियाच्या माध्यमातून पैसा कमावता येतो हे आपल्या जनतेला कळू लागलं आहे, तेव्हापासून गल्लोगल्लीत यूट्यूबर्स, इन्फ्लुएन्सर्सचे पेव फुटले आहे. खरंतर देशाला डिजिटल इंडिया करण्यामागचा सरकारचा हेतू अगदी प्रामाणिक होता. सगळं जग डिजिटल होत असल्याने भारतानेही या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून काळाच्या बरोबर एक पाऊल पुढे टाकावे यासाठी सगळा खटाटोप करण्यात आला. सोशल मीडियाच्या माध्यमातून सरकारी योजना, प्रकल्प, सरकारी सेवा, आपला इतिहास सर्वदूर पोहचवण्याचा मुख्य हेतू होता. तसेच पुरातन दस्तवेजांचे, महत्त्वाच्या कागदपत्रांच्या धूळ खात पडलेल्या गठ्ठयांचे रूपांतर डिजिटलमध्ये झाल्यास ते दीर्घकाळ टिकतात यासह डिजिटलच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार जनतेने शिकावेत आणि देश प्रगत व्हावा यासाठी डिजिटलवर भर देण्यात आला. याचा फायदा तर झालाच. लोक डिजिटल शिक्षित तर झालेच तसेच डिजिटल म्हणजे अपडेशन तर आलंच. त्यामुळे त्यातून रिल, शॉर्ट्ससारखे नवनवीन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मही निर्माण होत आहेत. काही जण त्याचा योग्य आणि सभ्य वापर करीत आहेत. त्यातून काहींनी व्यवसाय सुरू केला आहे. पण सध्या या सोशल मीडियाचा जो गैरवापर काहींनी विशेषकरून महिलांनी सुरू केला आहे तो धक्कादायक आहे.

## आजची चित्रोळी



लाल चोचीचा निळा पक्षी
बसला आहे थाटात !
फांदीवरती बसून सखीला
होता हांका मारीत !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# मुलांनो मैदानात या......



आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

**- श्याम ठाणेदार**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये ठाणे जिल्ह्यातील ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार करणार मतदान

**ठाणे (रोहित जैसवार)** - विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. तर दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडेल.

ठाणे जिल्ह्यात १३४-भिवंडी ग्रामीण (अ.ज.), १३५-शहापूर (अ.ज.), १३६-भिवंडी पश्चिम, १३७-भिवंडी पूर्व, १३८-कल्याण पश्चिम, १३९-मुरबाड, १४०-अंबरनाथ (अ.जा.), १४१-उल्हासनगर, १४२-कल्याण पूर्व, १४३-डोंबिवली, १४४-कल्याण ग्रामीण, १४५-मिरा भाईंदर, १४६-ओवळा माजिवाडा, १४७-कोपरी पाचपाखाडी,



१४८-ठाणे, १४९-मुंब्रा कळवा, १५०-ऐरोली, १५१-बेलापूर असे १८ विधानसभा मतदारसंघ आहेत.

**मतदारसंघाचे एकूण मतदार:-**

ठाणे जिल्ह्यात दि. २९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार: ३८ लाख ४५ हजार ४२, महिला मतदार: ३३ लाख ८२ हजार ८८२, इतर/ तृतीयपंथी मतदार : १ हजार ४१५ आहेत. तसेच यामध्ये सैनिक मतदार : १ हजार ६०३, एनआरआय मतदार: ९७९, दिव्यांग ३८ हजार १४९, १८-१९ वयोगटातील १ लाख ७२ हजार ९८१ मतदार तर ८५ पेक्षा अधिक वयोगटातील ५६ हजार ९७६ मतदार आहेत.

तरी, पात्र मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पान १ वरून...

### महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध

या महाराष्ट्रनामामध्ये महिलांना वर्षाला ६ सिलेंडर ५०० रुपयात दिले जातील, महिला अत्याचाराला आळा घालण्यासाठी शक्ती कायदा आणला जाईल. ३०० युनिट पर्यंत वीजवापर असणा-या ग्राहकांना १०० युनिट मोफत वीज, नवीन औद्योगिक धोरणात रोजगार निर्मितीवर भर असेल. सरकारच्या विविध विभागातील रिक्त २.५ लाख जागा भरल्या जातील. एमपीएससीच्या माध्यमातून नोकर भरती केली जाईल. सरकारी नोकऱ्यातील कंत्राटी भरती पद्धत बंद करणार, सरकारी विभागातील जागांचा अनुषेश भरून काढणार. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेळापत्रक ठरवून निवडणुका घेतल्या जातील. महाराष्ट्राच्या विकासासाठी कृषी, ग्रामविकास, उद्योग, रोजगार, शहरी विकास, जनकल्याण यावर आधारित आहे.

महाराष्ट्राच्या विकासासाठी महाराष्ट्रनामा प्रकाशित करत आहोत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इंदू मिलमधील स्मारकाचे काम पूर्ण करू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉरिडॉर बनवला जाईल. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराचे सरकार स्थापन करु तसेच २०३० पर्यंत समृद्ध महाराष्ट्र बनवण्याचा संकल्प या जाहिरनाम्यातून केला आहे.

यावेळी बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे म्हणाले की, महाराष्ट्रात सर्व जाती धर्माचे लोक मुंबईकडे आर्थिकदृष्या, रोजगारासाठी, उत्पादन, गुंतवणुकीच्या दृष्टीने अपेक्षेने पहातात.

देशभरातून लोक मुंबईत स्वप्न घेऊन येतात व मुंबई त्यांना सामावून घेते, त्यांच्या स्वप्नांचा बळ देते. सामाजिक बदलातही महाराष्ट्र आघाडीवर असतो. महाराष्ट्राची निवडणूक फक्त महाराष्ट्रासाठी नाही तर देशाचे भविष्य बदलणारी निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी शेतकरी, तरुण, महिलांसाठी हे सरकार घालवणे गरजेचे आहे. भाजपा युतीचे खोके सरकार सत्तेतून खाली खेचून महाविकास आघाडीचे आणा असे आवाहन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपाचा समाचार घेत मल्लिकार्जून खर्गे पुढे म्हणाले की, कर्नाटकात काँग्रेस सरकार महिलांना महालक्ष्मी योजनेतून २ हजारे रुपये देत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्याची खिल्ली उडवली आणि आता त्यांचेच सरकार महाराष्ट्रात लाडकी बहिण योजनेतून १५०० रुपये देत आहेत. काँग्रेसच्या योजनेची नक्कल भाजपाने केली आहे. राहुल गांधी यांनी संविधानाचे लाल रंगाचे पुस्तक दाखवले तर त्याला शहरी नक्षलवाद म्हणून टीका करत आहेत पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना लाल रंगाचे संविधान दिल्याचा फोटो दाखवून खर्गे यांनी भाजपा व नरेंद्र मोदी यांच्या टीकेतील हवा काढून घेतली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले की, भाजपा युती सरकारला दीड वर्षात शेतकऱ्यांची आठवण आली नाही पण आता त्यांना शेतकऱ्यांची आठवण आली असून कर्जमाफी करण्याच्या वल्गणा करु लागले आहेत. महागाई, बेरोजगारी, महिला, शेतकरी दिसले नाहीत आता त्यांना पराभव दिसत असल्याने त्यांना यांची आठवण झाली आहे. आता भाजपा युती सरकार खाली खेचण्याची वेळ आली असून महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेने परिवर्तन करण्याचा मानस बनवला आहे.

शिवसेना खासदार संजय राऊत यावेळी म्हणाले की, महाराष्ट्र कधी कोणाचा गुलाम बनला नाही व बनणार नाही हा जाहिरनामा महाराष्ट्राचा स्वाभिमान दाखवणारा आहे. ‘एक रहेंगे तो सेफ रहेंगे’ म्हणणारे नरेंद्र मोदी जोपर्यंत महाराष्ट्रात येत राहतील तोपर्यंत महाराष्ट्र अनसेफ, राहिल असे संजय राऊत म्हणाले.

जाहिरनामा समितीच्या सदस्य खा. वंदना चव्हाण यांनी मविआच्या जाहिरनाम्याबद्दलची सविस्तर माहिती दिली. तर काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांनी आभार व्यक्त केले.

महाविकास आघाडीचा जाहिरनामा नरिमन पाईंट येथील हॉटेल ट्रायडंटमध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्या प्रमुख उपस्थिती मविआतील सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अविनाश पांडे, खासदार अभिषेक मनु सिंघवी, AICC च्या मीडिया विभागाचे चेअरमन प्रविण खेरा, सचिव बी. एम. संदीप, वॉर रुम प्रभारी वामशी रेड्डी, काँग्रेस वर्किंग कमीटीचे सदस्य खा. डॉ. नासीर हुसेन, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, शिवसेनेचे खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे आदी उपस्थित होते.

### माथेरानच्या राणीचा ‘विस्टाडोम’ विनाच...

पारदर्शक काचेच्या खिडक्या आणि छत असलेल्या विस्टाडोम डब्यातून संपूर्ण निसर्गरम्य वातावरण पाहता येते. तसेच डब्याच्या आतील भागात सेल्फीसाठी विशेष जागा आहे. आकर्षक रंग, नावीन्यपूर्ण अंतर्गत सजावट, आरामदायी आसनव्यवस्था, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरा, रंगीबेरंगी एलईडी विद्युत दिवे, एलईडी टीव्ही स्क्रीन, नक्षीदार लाकडी फर्निचर अशा अनेक सुविधा या विस्टाडोममध्ये अंतर्भूत असल्याने, पर्यटक जादा तिकिटांचे पैसे खर्च करून, विस्टाडोम डब्याने प्रवास करत होते. मात्र, गेल्या काही कालावधीपासून मिनी ट्रेनचा डबा गायब असल्याने, पर्यटकांमध्ये नाराजी पसरली आहे.

दरवर्षी पावसाळयात नेरळ-माथेरानची थेट सेवा बंद केली जाते. यावर्षी ८ जून ते १५ ऑक्टोबरपर्यंत ही नेरळ ते अमन लॉज सेवा बंद करण्यात आली होती. तर, हा कालावधी ५ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आला. त्यामुळे प्रवासी आणि पर्यटकांसाठी फक्त माथेरान ते अमन लॉज दरम्यान शटल सेवा सुरू होती. तर, ६ नोव्हेंबरपासून नेरळ ते माथेरान मिनी ट्रेन सेवा सुरू झाली. मिनी ट्रेन सुरू झाल्याची माहिती मिळताच माथेरानला जाण्याचे नियोजन केलेल्या पर्यटकांनी नेरळ स्थानकातील तिकीट खिडकीवर तिकिटासाठी गर्दी केली होती. त्यानुसार सकाळी नेरळहून ८.५० वाजता पहिली ट्रेन नेरळ ते माथेरान दरम्यान चालविण्यात आली. यानंतर सकाळी १०.२५ वाजता नेरळ माथेरान दरम्यान दुसरी गाडी धावली.

नेरळ-माथेरान मिनी ट्रेनचा विस्टाडोम डबा नियमित दुरुस्तीसाठी परळ येथील कारखान्यात पाठवण्यात आला आहे. साधारणपणे एका महिन्याने हा डबा मिनी ट्रेनला जोडला जाईल.

**– डॉ. स्वप्नील निला, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे**

मुंबई, ठाणे आणि पुणे येथील पर्यटकांसाठी माथेरान हे सर्वात जवळचे आणि सर्वाधिक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. तसेच, नेरळ-माथेरान दरम्यान धावणारी मिनी ट्रेन म्हणजेच माथेरानची राणी पर्यटकांच्या खास आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. पावसाळयात थेट नेरळ-माथेरान मिनी ट्रेनची सेवा बंद होती.

### मनोज जरांगेंनी मराठा आरक्षणासाठी...

एक लाख समाज बांधव उपोषणाला बसल्यानंतर किती डॉक्टर त्यांना लागतील हे सांगता येत नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे.

गेवराईमध्ये उभारण्यात आलेल्या संपर्क कार्यालयातून अन्याय होणाऱ्या लोकांना न्याय मिळणार असल्याचा विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. विधानसभा निवडणुका लागल्या आहेत. कोणाला पडायचं आणि कुणाला आणायचं हे तुम्हीच ठरवायचं आहे. तर ज्यांनी उपोषणाला विरोध केला त्यांना असे पाडा की पुन्हा पाच पिढ्या उभा राहिले नाही पाहिजेत. या गेवराई मतदारसंघातून मी एकच सांगतो की आपल्याला निवडणुकीचे काही देणे घेणे नाही. मात्र ज्यांनी आरक्षणाला विरोध केलाय त्यांनी समाजाला विरोध केलाय त्यांना पाडा. बॉण्ड लिहून घ्या अथवा नका लिहून घेऊ, मात्र सर्वांचा विचार करा आणि एक गठ्ठा मतदान करा. असे आवाहनही मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केलं. आता सरकारच्या विरोधात पुन्हा एकदा उपोषणासारखा हत्यार पुकारावा लागत आहे.असेही ते म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघामध्ये त्यांचे सहकारी असलेले महेश दाभाडे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन केलं. यावेळी ते बोलत होते.

### जेलमध्ये बसून अमेरिका-रशियात दहशत

काही महिन्यांपूर्वी एनआयएच्या तपासातून असं समोर आलं होतं की, लॉरेन्स बिश्नोई गँगमध्ये ७०० हून अधिक शूटर्स आहेत, त्यापैकी ३०० शूटर्स पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि आसपासच्या भागातील आहेत. उर्वरित ४०० शूटर्स मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्रात पसरलेले आहेत. लॉरेन्स गँगंध्ये सामील असलेले सर्व शार्प शूटर फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून गँगच्या संपर्कात असल्याचंही तपास यंत्रणेने उघड केलं आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून या शार्प शूटर्सनी दहशत निर्माण केली. एनआयएच्या म्हणण्यानुसार, लॉरेन्स बिश्नोईची गँग आधी पंजाबपर्यंत मर्यादित होती. स्वतःला सलमान खानचा शत्रू म्हणवून घेणाऱ्या लॉरेन्स बिश्नोईच्या गँगचं नेटवर्क आता अनेक राज्यात पसरलं आहे. कॅनडात बसलेल्या गोल्डी बराडसोबत लॉरेन्सने हरियाणा, दिल्ली आणि राजस्थानच्या गँगशी हातमिळवणी करून मोठी गँग तयार केली.

लॉरेन्स बिश्नोई गँग आता उत्तर भारतात पंजाब, उत्तर प्रदेश, हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली, राजस्थान आणि झारखंडपर्यंत पसरली आहे भारताबाहेर ही गँग आता अमेरिका, पोर्तुगाल, कॅनडा, यूएई आणि रशियामध्ये पसरली आहे. लॉरेन्स बिश्नोई सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या गँगमधील शूटर्स आणि लोकांशी संपर्क साधतो. जेलमध्ये येणाऱ्या कैद्यांवरही त्याची नजर असते.

लॉरेन्स गँगने अनेक तरुणांना कॅनडा किंवा इतर देशात जाण्याचं आमिष दाखवून फसवल्याचं तपासात समोर आलं आहे. कॅनडामध्ये लॉरेन्स गँगची पकड मजबूत होत आहे. सातासमुद्रापार आणि देशाच्या विविध भागात पसरलेल्या या गँगची संपूर्ण कमान अजूनही लॉरेन्स बिश्नोईच्या हाती आहे. साबरमती जेलमध्ये असलेल्या लॉरेन्सला गँगबाबतचा प्रत्येक रिपोर्ट मिळत असतो.

### कोकण मार्गावरील एक्सप्रेसला जोडले...

गाडी क्रमांक १६३३६ नागरकोइल-गांधीधाम एक्स्प्रेसला २६ नोव्हेंबर २०२४ रोजी आणि गाडी क्रमांक १६३३५ गांधीधाम-नागरकोइल एक्स्प्रेसला एलएचबी डबे जोडले जाणार आहेत. या एक्स्प्रेसला एक द्वितीय श्रेणी वातानुकूलित डबा, पाच तृतीय श्रेणी वातानुकूलित डबे, ११ शयनयान, २ जनरल डबा, १ एसएलआर डबा, १ पॅन्ट्री कार डबा, १ जनरेटर कार असे एकूण २२ डबे असतील, अशी माहिती कोकण रेल्वे प्रशासनाने दिली.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## ठाणे जिल्हा माहिती कार्यालय निर्मित "विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ पूर्वपीठिका" फ्लिप-बुक ऑनलाईन उपलब्ध

**ठाणे (रोहित जैसवार)** - "विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४" च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अशोक शिनगारे व कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे मार्फत "विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पूर्वपीठिका" तयार करण्यात आली आहे.

या पुस्तिकेचे डिजिटल प्रकाशन नुकतेच जिल्हाधिकारी महोदयांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत संपन्न झाले.

अशा प्रकारची पर्यावरणपूरक व नाविन्यपूर्ण फ्लिप-बुक स्वरूपातील "विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पूर्वपीठिका" ही पुस्तिका राज्यात प्रथमच तयार करण्यात आली आहे.

"विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ पूर्वपीठिका" या पुस्तिकेद्वारे जिल्ह्यातील प्रसारमाध्यम प्रतिनिधी व सामान्य नागरिकांकरिता विधानसभा सार्वत्रिक निवडणूक १९६२ ते २०१९ या कालावधीतील ठाणे जिल्ह्यातील विविध मतदारसंघातील उमेदवारनिहाय मतदानाची अंतिम आकडेवारी देण्यात आली आहे.

या पुस्तिकेची निर्मिती करण्यासाठी कोकण विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक (माहिती) डॉ.गणेश मुळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी या पुस्तिकेचे मुख्य संपादक म्हणून काम पाहिले आहे.

# रायगडमधील ४ हजार हेक्टर वरील फळबागेला पुनर्लागवडीची प्रतीक्षा

**रायगड (भावना जैन) :** आंबा, काजू, नारळ- सुपारीच्या बागांमध्ये ३ जून २०२० रोजी आलेले आतापर्यंत सर्वात मोठ्या वादळाच्या पाऊलखुणा आजही दिसतात. चार वर्षापूर्वी आलेल्या या चक्रीवादळाने रायगड जिल्ह्यात अवघ्या दोन-तीन तासांत कोट्यवधींची हानी केली. हजारो कुटुंब बेघर झाली. बागायतदार पुरता कोलमडून गेले. त्यानंतर मुख्यमंत्री, मंत्री, नेते मंडळी, केंद्रीय पथकांचे दौरे झाले. सरकारकडून तातडीने पावणे चारशे कोटी रुपये निधी देण्यात आला, परंतु चार वर्षानंतरही जिल्ह्यातील बागायत क्षेत्राचे झालेले नुकसान भरून निघाले नाही.

निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या फळबागांसाठी रोजगार हमी योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनर्जीवन योजना जिल्ह्यात राबवण्यात आली. या योजनेतून नऊ हजार ४२० हेक्टर क्षेत्रातील फळबाग लागवडीला मंजुरी देण्यात आली होती; मात्र प्रत्यक्षात पाच हजार २०० हेक्टर क्षेत्रातच रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना आर्थिक साह्य देण्यात आले. अद्यापही ४० टक्के म्हणजे चार हजार



२२० हेक्टर क्षेत्रावर पुनर्लागवड योजना राबवण्यातच आली नसल्याची माहिती समोर येत आहे. आंबा, काजू, नारळ-सुपारीच्या बागांमध्ये ३ जून २०२० रोजी आलेले आतापर्यंत सर्वात मोठ्या वादळाच्या पाऊलखुणा आजही दिसतात. हे नुकसान भरून काढण्यासाठी तत्कालीन राज्य सरकारने विशेष फळबाग लागवड योजना बागायतदारांसाठी सुरु केली होती. परंतु रोपाची उपलब्धता आणि शेतकऱ्यांची बदलती मानसिकता यामुळे अद्याप चार हजार २२० हेक्टर नुकसानग्रस्त क्षेत्रात लागवड झालेली नाही.

चक्रीवादळात सर्वाधिक फटका सुपारी पिकाला बसला होता. सुपारीच्या ६० टक्के बागा भुईसपाट झाल्या होत्या, त्यामुळे कमी उंचीच्या सुपारीची जात विकसित करून त्या जातीची रोपे शेतकऱ्यांना देण्यात आली. तरीही सुपारीचे पीक पूर्वपदावर आलेले नाही.

संपूर्ण किनारपट्टीवर निसर्ग चक्रीवादळाचा प्रभाव जाणवला. श्रीवर्धन आणि मुरूडमध्ये सर्वाधिक नुकसान झाले असून, पोलादपूर, माणगाव, रोहा, कर्जत आदी किनारपट्टीच्या आत असणाऱ्या ठिकाणांनाही वादळाचा फटका बसला होता. ११ हजार २८१ हेक्टरमधील बागांचे आणि पिकांचे नुकसान झाले होते. अलिबाग ते कर्जतपर्यंतच्या पट्ट्यात शेकडोंच्या संख्येत झाडे उन्मळून पडली. सरकारने या निसर्गग्रस्तांसाठी ५६ कोटी ५८ लाख रुपयांची तांत्रिक मंजुरी दिली होती. इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करूनही फारशी मदत मिळाली नसल्याचे नुकसानग्रस्त सांगतात.

## डोंबिवलीत छोट्या किल्लेदारांचा कल्ला

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** सालाबाद प्रमाणे यंदाच्या दिवाळीत डोंबिवलीतील ट्रेक क्षितिज संस्थेने बच्चे कंपनीला भव्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. दिवाळी सणाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या किल्ले प्रतिकृतींच्या बांधणी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन छोट्या दोस्तांनी एकाहून एक सरस किल्ले बांधून इतिहासाच्या पाऊलखुणा जागृत करण्याचा प्रयत्न केला. संस्थेने आयोजित केलेल्या किल्ले बांधणी स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि.९) श्रीगणेश मंदिरातील वक्रतुंड सभागृहात पार पडला.



गेल्या २४ वर्षांपासून ट्रेक क्षितिज संस्था दुर्गसंवर्धन आणि दुर्गभ्रमंती या क्षेत्रात कार्यरत आहे. या संस्थेने २०११ पासून डोंबिवली आणि ठाकुर्ली परिसरात किल्ले बांधणी स्पर्धा सुरू केल्या. सुरूवातीच्या ३ वर्षात किल्ले बांधणीच्या कार्यशाळा आयोजित केल्या. त्यामुळे किल्ल्याची बांधणी, माहिती, स्वच्छता, इको फ्रेंडली वस्तूंच्या वापरामध्ये घडत असलेले सकारात्मक बदल १३ वर्षात पहायला मिळाले.

यंदाच्या दिवाळीत स्पर्धकांनी किल्ला बांधायच्या आधी त्या किल्ल्याला प्रत्यक्ष भेट दिली आहे का यावरून त्यांना अधिक गुण देण्याचे संस्थेने परीक्षणात बदल घडवून आणले. मुलांनी गड-किल्ले नुसते न बांधता त्यांनी ते प्रत्यक्ष पाहून अभ्यासावेत, हा त्यामागील उद्देश होता.

या वेळी ट्रेकक्षितिजच्या परीक्षण टीमने डोंबिवली आणि ठाकुर्ली परिसरातील जवळपास ६२ किल्ल्यांचे परिक्षण केले. विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी आणि आणि महेंद्र गोवेकर लिखित नकाशातून दुर्ग भ्रमंती या प्रसिद्ध पुस्तकाच्या प्रतींसह किल्ले बांधणीत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना छोटी रोप बॅग भेट म्हणून देण्यात आली.

### विजेते स्पर्धक असे...

- ज्युनिअर ग्रुप (छोटा गट)
- हरिहर गड : ओम गडे आणि मित्र मंडळ
- सुवर्णदुर्ग : जय भवानी मित्र मंडळ (विवेकानंद सोसायटी )
- पद्मदुर्ग : श्री साईनाथ मित्र मंडळ
- सीनिअर ग्रुप (मोठा गट)
- वेल्लोर किल्ला : स्वराज्य ग्रुप (विवेकानंद सोसायटी)
- तोरणा गड : आयरे रोडचा राजा
- उदगीर किल्ला : कान्होजी आंग्रे मित्र मंडळ
- विशेष पारितोषिक...
- लोहगड : स्वराज्य प्रतिष्ठान (किल्ल्यांवरील अतिक्रमण हा ज्वलंत विषय योग्य प्रकारे मांडल्याबद्दल)
- प्रतापगड : जाणता राजा (ऑडियो/व्हिडिओ व्हिज्युअल देखावा)
- जेजुरी गड : शिवबा ग्रुप (असा गड बांधायचा विचार करणे आणि उत्तम प्रकारे माहिती सांगून तो लोकांसमोर सादर करणे)

## घरून मतदानासाठी दिव्यांग, ज्येष्ठ मतदारांचा अल्प प्रतिसाद

**पालघर (सुचिता देशमुख) :** घरुन मतदान करण्याची मुभा असलेल्या दिव्यांग ८५ वर्षावरील ज्येष्ठ मतदारांनी मतदान करण्यास अल्प प्रतिसाद नोंदवला आहे. पात्र असलेल्या मतदारांपैकी या प्रवर्गातील केवळ तीन टक्के मतदारांनी घरून मतदान करणासाठी अर्ज केले आहेत. जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघ दिव्यांग व ८५ वर्षावरील ज्येष्ठ मतदार असे ३६ हजार ६६२ मतदार आहेत. यापैकी केवळ एक हजार अडतीस मतदारांनी घरून मतदान करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. ३६ हजार ६६२ मतदारांना घरुन मतदान करण्यासाठी अर्ज देण्यात आले होते.



सर्वांपर्यंत अर्ज पोहचवल्याचा दावा प्रशासनाने केला असला तरी केवळ एक हजार अडतीस जणांनी मतदानासाठी संमती दर्शवली आहे. घरून मतदान करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून हे मतदान प्रक्रिया रविवार दि. १० नोव्हेंबरपर्यंत सुरु राहणार आहे पालघर जिल्ह्यातील सह विधानसभा मतदारसंघांमध्ये ८५ वषपिक्षा अधिक असलेले मतदार १९४२९ आहेत, तर ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांग असणारे १७२३३ मतदार आहेत. यापैकी १९३ ज्येष्ठ मतदारांनी तर १२५ विष्यांगानी घरून मतदान करण्यासाठी अर्ज दाखल केले आहेत. तर या प्रवर्गातील इतर मतदार मतदान केंद्रांवर जातान मतदान करणार असल्याचे या प्रक्रियेचा प्रभार असलेल्या यंत्रणेने म्हटले आहे. जिल्ह्यात या प्रवर्गातील काही मतदारांपर्यंत अर्जच पोहोचले नसल्याची चर्चा आहे. ३६ हजार ६६२ मतदारांपैकी एक हजार अडतीस जणांनी संमती दाखवणे म्हणजे उर्वरित मतदार मतदान केंद्रांवर येऊन मतदान करणार का किंवा मतदानाला ते पाठ फिरवतील अशी साशंकता निर्माण होत आहे.

## कर्जत तालुक्यात भाताचे भारे पेटविले; गुन्हा दाखल

**कर्जत (गणेश बागडे) - :** पाच महिने रक्ताचे पाणी करून पिकवलेल्या भाताचे भारे कुणीतरी पेटवल्याचा धक्कादायक प्रकार कर्जत तालुक्यात उघडकीस आला आहे. दहिवील ग्रामपंचायत हद्दीतील सामाईक पिकवलेल्या शेतात हा प्रकार घडल्याने तालुक्यात खळबळ उडाली. इतर शेतकरी या प्रकारामुळे धास्तावले आहे. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. कोदिवले येथे भगवान लक्ष्मण तरे, केशव लक्ष्मण तरे, नाना लक्ष्मण तरे आणि संतोष लक्ष्मण तरे यांची सामाईक शेती आहे. त्यांनी भाताची कापणी करून शेतात भारे साठवले होते. मात्र, शनिवारी (दि. ९ नोव्हेंबर) पहाटे साडेतीनच्या सुमारास कुणीतही त्यांच्या शेतातील भाताचे भारे पेटवून दिले. तरे कुटुंबीयांना हा प्रकार कळताच त्यांनी शेतात धाव घेतली तोपर्यंत कापणी केलेल्या भाताचे भारे खाक झाले होते. काही महिन्यांपूर्वी आमच्या शेतामधील बोअरवेलची मोटार चोरण्यात आली. शिवाय बोअरवेलमध्ये दगड टाकून नुकसान करण्यात आले होते. आता वर्षभराच्या अन्नधान्याची नासधूस केली आहे. हा प्रकार राजकीय वैमनस्यातून केल्याची शक्यता वाटते. म्हणून पोलीस प्रशासनाने सखोल चौकशी करून गुन्हेगारांना सर्वांसमोर आणावे अन्यथा आज आमचे नुकसान झाले आहे उद्या परिसरातील इतरांचेही नुकसान होईल.



## दोडामार्ग-घोटगेवाडी येथे आढळला उडता सोनसर्प



**दोडामार्ग (आकांक्षा नार्वेकर) :** दोडामार्ग-घोटगेवाडी येथे दुर्मीळ उडता सोनसर्प आढळून आला. शेतकरी सखाराम नारायण सुतार यांच्या घरालगत शुक्रवारी सायंकाळी हा साप दिसून आला. नेहमी आढळणाऱ्या प्रजातींव्यतिरिक्त नवीन प्रजातीचा साप असल्याचे सर्पमित्रांनी सांगितले.या सापाला सर्पमित्र लाडू गवस यांनी पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले. अशा प्रकारचा साप गतवर्षी जूनमध्ये येथील दत्त मंदिराच्या परिसरातील पिंपळाच्या झाडाखाली आढळून आला होता. या सापाला शेलाटी तथा उडता सोनसर्प तथा इंग्रजीत 'ऑरनेट फ्लाईग स्नेक' (शास्त्रीय नाव: क्रिसोपेलिया ओर्नाटा) म्हणतात. हा दक्षिण आणि आग्नेय आशियात आढळणारा साप आहे.

सहसा झाडांतून राहणारा हा सर्प फांद्यांतून लांब उड्डाणवजा उड्या मारू शकतो. माणसाला हानिकारक होईल इतका विषारी समजला जात नाही. हिरवट पिवळा ज्यावर काळे पट्टे आणि सुंदर नक्षी असलेला हा साप महाराष्ट्रातील गडचिरोली, चंद्रपूर आणि आंबोली घाटात काही प्रमाणात आढळून येतो. या सापाची लांबी ही सुमारे २.५ ते ४ फूट असून तो निमविषारी प्रवर्गातील असल्याचे जाणकारांचे मत आहे.

## दिवाळी सुट्टीनिमित्त श्रीवर्धन पर्यटकांनी हाऊसफुल

**बोर्ली पंचतन (विशाल पाटील) :** पर्यटकांच्या मनावर कोकण नेहमीचं भुरळ पाडत असतो. श्रीवर्धन तालुक्यातील विस्तीर्ण असे समुद्र किनारे, नारळी पोफळीच्या बागा, मासे तसेच मंदिरे पर्यटकांसाठी नेहमीचं आकर्षण ठरत असतात. शाळांना दिवाळीच्या सुट्ट्या असल्यामुळे श्रीवर्धन कडे पर्यटकांचा कल वाढू लागला आहे त्यामुळे दिवाळी सुट्यांमध्ये श्रीवर्धन मधील दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर येथील पर्यटन फुललेले दिसून येत आहे. सुट्ट्या सुरू होताच अनेक घरात पर्यटनाचे बेत आखले जातात. सध्या दिवाळीच्या सुट्ट्यांचा हंगाम सुरू झाल्याने श्रीवर्धन मध्ये पर्यटकांची संख्या वाढलेली पहावयास मिळत आहे त्यामुळे येथील सर्व व्यवसाय देखील तेजीत आहे.



समुद्राची ओढ सगळयांनाच असते. उसळणाऱ्या लाटा, फेसाळलेले निळेशार पाणी, किनाऱ्यावरील सोनेरी वाळू, समुद्रातील साहसी खेळ, बोटिंग यामुळे कोकणात अगदी फॉरेन टूरचा फील येतो. यातच कोकणातील वळणदार रस्ते, उंच डोंगर आणि घनदाट झाडी यामुळे कोकण कायमच हवाहवासा वाटतो. धार्मिक पर्यटन करणाऱ्यांसाठी श्रीवर्धन मधील सोमजाई मंदिर, पेशवे मंदिर, दक्षिण कशी हरिहरेश्वर तसेच दिवेआगर श्री सुवर्णगणेश मंदिर आणि दिघी येथून बोटीने मुरुड जंजिरा किल्ला असे अनेक पर्याय आहेत.

## १३०-पालघर (अ.ज) विधानसभा मतदारसंघात दुसरे सरमिसळ करण्याची प्रक्रिया पुर्ण

**पालघर (सतीश सोनावणे) :** महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत १३०-पालघर (अ.ज) विधानसभा मतदारसंघ निवडणूकीचा महत्वाचा टप्पा यादृष्टीने मतदान केंद्रावरती वापरण्यात येणाऱ्या EVM मशिन्स (कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट व VVPAT मशिन्स) यांची दुसरे सरमिसळ (Randomization) करण्याची प्रक्रिया दि. ०९/११/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, तहसिलदार कार्यालय पालघर येथे १३०-पालघर (अ.ज) विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, महेश सागर यांच्या मार्फत करण्यात आली. ही प्रक्रिया, १३०-पालघर (अ.ज) विधानसभा मतदारसंघातील दोन उमेदवार व इतर उमेदवारांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष करण्यात आली. मा. भारत निवडणूक आयोग यांचे निवडणूक निरीक्षक (Observer) सुहास एल.वाय. हे दूरदृष्य प्रणालीव्दारे (V.C.) उपस्थित होते व त्यांच्या निरीक्षणाखाली सदर प्रक्रिया करण्यात आली. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा पालघर तहसिलदार रमेश शेंडगे, हे उपस्थित होते. उपस्थित दोन उमेदवार व उमेदवारांचे प्रतिनिधी यांना दुसऱ्या सरमिसळच्या याद्या देण्यात आल्या तसेच त्यांचे समक्ष सुरक्षा कक्ष (Strong Room) उघडण्यात येवून EVM च्या सरमिसळ प्रक्रियेतील याद्यातील क्रमानुसार EVM ची रचना करण्यात आली.

## परशुराम घाटात ट्रकला अपघात; महामार्गावर वाहतुकीची कोंडी

**चिपळूण शहर (दिगंबर जाधव) :** महामार्ग चौपदरीकरण अंतर्गत नव्याने तयार करण्यात आलेला परशुराम घाट सद्यस्थितीत वाहतुकीला अत्यंत धोकादायक ठरू लागला आहे. परशुराम घाटातील पावसाळ्यात कोसळलेली दरड पूर्णपणे न हटविल्याने आणि त्याच मार्गिकेवरून दुतर्फा वाहतूक तीही अरूंद रस्त्यावरून सुरू केली होती. परिणामी, शनिवारी सकाळी ११महामार्गाचे चौपदरीकरण अंतर्गत एका बाजूला डोंगर कटाई, तर दुसऱ्या बाजूला भराव टाकून घाटाच्या दरीची वाढविलेली उंची, अशा स्थितीतील या चौपदरी परशुराम घाटात डोंगर कटाई केलेल्या ठिकाणची दरड कोसळणे व भराव टाकलेल्या दरीकडील भागाकडील रस्ता खचणे या घटनांमुळे हा घाट पूर्णपणे असुरक्षित व धोकादायक बनला आहे.



गत दहा वर्षांहून अधिक काळ मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरू आहे. प्रामुख्याने परशुरामपासून आरवलीपर्यंतच्या मधल्या टप्प्यात रुंदीकरणाचे काम धिम्या गतीने सुरू आहे. प्रामुख्याने परशुराम घाट ते चिपळूण शहर या ठिकाणी दहा वर्षांत चौपदरीकरण कामाचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. जुना परशुराम घाट रूंदीकरण अंतर्गत सुमारे एक ते दीड कि.मी. अंतराच्या लांबीपर्यंत भराव टाकून उंच करण्यात आला आहे. एका बाजूला रूंदीकरणासाठी डोंगराची कटाई केली आहे. अनेक ठिकाणची वळणे आणि उतार कमी करण्याकरिता डोंगर कटाई आणि भराव अशा स्वरूपात घाटातील चौपदरीकरणाचे काम करण्यात आले आहे. मात्र, कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे कोसळणाऱ्या दरडींबरोबरच दरीकडील बाजूचा मातीचा भराव व रस्ता खचण्याच्या घटनांवरून दिसून येत आहे.

पावसामध्ये डोंगराकडील बाजूस दरडी कोसळण्याच्या काही घटना घडल्या, तर दरीकडील भराव टाकून केलेल्या उंच रस्त्याच्या बाजूच्या संरक्षक भिंतीसह भराव खचण्याच्या घटना घडल्या आहेत. काम सुरू असतानाच दरीकडील बाजूचा भराव खचून तसेच डोंगराकडील बाजूची दरड कोसळून दुर्घटना घडून जीवितहानी देखील झाली आहे. दुसरीकडे बहादूरशेख नाक्यापासून उभारण्यात येणाऱ्या उड्डाण पुलाचे कामदेखील अत्यंत धिम्या गतीने सुरू आहे. घाटामध्ये मध्यंतरात कोसळलेली डोंगराकडील बाजूची दरड अद्यापही पूर्णपणे बाजूला करण्यात आलेली नाही.

सुट्टीच्या हंगामात मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ सुरू राहिल्याने या परिसरात अर्धा-अर्धा तास वाहतूक कोंडी होत आहे. या मार्गावर चोवीस तास अवजड वाहनांची वर्दळ असते. अशा एकूणच परिस्थितीत परशुराम घाट सध्या वाहतुकीस धोकादायक बनला आहे.

# घरबसल्या पहा प्राजक्ता माळीचा 'फुलवंती' सिनेमा

मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळीचा 'फुलवंती' चित्रपट चांगलाच गाजला. प्राजक्ताचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला 'फुलवंती' ११ ऑक्टोबर रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. आता हा चित्रपट ओटीटीवर रिलीज करण्यात आला आहे. मात्र त्यात एक ट्विस्ट आहे. तो प्रेक्षकांना मोफत पाहता येणार नाही. प्राजक्ताने यासंदर्भात पोस्ट करून माहिती दिली आहे.

प्राजक्ता माळीने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट केली आहे. त्यात तिने 'फुलवंती' चित्रपट आता ओटीटीवर उपलब्ध आहे, अशी माहिती दिली. प्रेक्षकांना 'फुलवंती' सिनेमा घरबसल्या पाहता येईल. मात्र त्यासाठी त्यांना पैसे मोजावे लागणार आहे. हा चित्रपट प्राइम व्हिडीओवर रेंट देऊन पाहता येईल.




"पुणे- मुंबई- नाशिक बाहेरचे प्रेक्षक, सातत्याने 'फुलवंतीच्या' शोबद्दल विचारणा करत होते. त्यांच्यासाठी आनंदाची बातमी. अमेझॉन प्राइमवर टिकिट काढा आणि घरबसल्या चित्रपट पाहा," असं कॅप्शन देत प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर पोस्ट केली आहे. म्हणजेच 'फुलवंती'साठी पैसे मोजावे लागतील. प्राइम व्हिडीओचे सबस्क्रिप्शन असूनही तो मोफत पाहता येणार नाही.

पेशवाई काळातील 'फुलवंती' नावाची सुप्रसिद्ध नर्तिका आणि प्रकांडपंडीत व्यंकटशास्त्री यांची दमदार कथा असलेली आणि देखण्या कलाविष्काराने सजलेली 'फुलवंती' मराठी सिनेसृष्टीतील भव्यदिव्य कलाकृती आहे. या चित्रपटाला सिनेमागृहांमध्ये प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. अजूनही पुणे-मुंबईत हा चित्रपट सिनेमागृहांमध्ये सुरू आहे. आता तो ओटीटीवर रेंटवर उपलब्ध आहे.

'फुलवंती' सिनेमाबद्दल बोलायचे झाल्यास यामध्ये प्राजक्ता माळी, गश्मीर महाजनी मुख्य भूमिकेत आहेत. तसेच इतर मराठी कलाकारांची यात मांदियाळी आहे. या चित्रपटाचे संवाद लेखन प्रविण विठ्ठल तरडे यांचे असून दिग्दर्शन स्नेहल प्रविण तरडेंनी केले आहे. चित्रपटाच्या छायाचित्रणाची जबाबदारी महेश लिमये यांनी सांभाळली आहे. अविनाश-विश्वजीत यांनी संगीताची धूरा सांभाळली आहे. कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, मंगेश पवार, श्वेता माळी, प्राजक्ता माळी चित्रपटाचे निर्माते आहेत.

## निक्कीला भेटण्यासाठी मुंबईत आला घन:श्याम!



'बिग बॉस मराठी'चं पाचवं पर्व संपल्यावर आता सध्या सर्वत्र यंदाच्या सीझनमध्ये सहभागी झालेल्या कलाकारांचं रियुनियन पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी सूरज चव्हाणच्या मोढवे गावी धनंजय पोवार, जान्हवी किल्लेकर, वैभव चव्हाण, इरिना असे सगळे सदस्य पोहोचले होते. या पाठोपाठ अंकिता वालावलकर आणि तिचा होणारा नवरा कुणाल हे दोघंही सूरजला भेटून आले. आता लवकरच पंढरीनाथ सुद्धा त्याची भेट घेणार आहे. पण, एकीकडे सगळे सूरजच्या गावी जात असताना दुसरीकडे छोटा पुढारीने मुंबई गाठून आपल्या लाडक्या बहिणीची भेट घेतली आहे.
'बिग बॉस मराठी'च्या घरात पहिल्या दिवसापासून यंदा दोन गट पडले होते. यापैकी एका गटात निक्की, अरबाज, वैभव, जान्हवी आणि घन:श्याम एकत्र खेळत होते. कालांतराने या 'टीम ए'मध्ये फूट पडली आणि यांची मैत्री देखील तुटली. जान्हवी आणि वैभवने स्वतंत्रपणे आपला खेळ खेळण्यास सुरुवात केली. मात्र, शेवटपर्यंत निक्की, अरबाज आणि घन:श्याम एकत्र राहिले. या तिघांनी एकमेकांची साथ अजिबात सोडली नाही. अगदी घराबाहेर आल्यावर सुद्धा या तिघांनी आपली मैत्री निभावली आहे. याचा प्रत्यय छोटा पुढारीने नुकत्याच शेअर केलेल्या एका व्हिडीओतून आला आहे. घन:श्याम आपल्या लाडक्या निक्कू ताईला भेटण्यासाठी मुंबईत आला होता. यावेळी त्याने निक्की-अरबाजची भेट घेतली. या दोघांनी तुझ्या वाढदिवसाला डिसेंबर महिन्यात आम्ही तुझ्या गावी येणार असंही त्याला सांगितलं. हे ऐकून छोटा पुढारी खूपच आनंदी झाला. आनंदाच्या भरात तो म्हणाला, "२५ डिसेंबरला हे दोघं येणार आहेत. निक्की ताई बोलली मग विषय संपला. अरबाज दा...नाही भाई" घन:श्यामची ही चूक निक्की अचूक हेरते आणि म्हणते "बाई काय म्हणतोय दाजी..." यावर घन:श्याम म्हणतो, "नाही दाजी नाही भाई...दाजी करायचा विचार नक्कीच चालू आहे." निक्की सुद्धा यावर हो असं उत्तर देते. नेटकऱ्यांनी या तिघांची भेट झाल्याचं पाहून आनंद व्यक्त केला आहे. "माझी निक्कू ताई आणि अरबाजची भेट" असं कॅप्शन देत घन:श्यामने हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. या तिघांच्या चाहत्यांनी यांच्या बॉण्डिंगचं कौतुक केलं आहे. दरम्यान, आता मित्राला शब्द दिल्याप्रमाणे निक्की-अरबाज डिसेंबरमध्ये छोटा पुढारीच्या वाढदिवसाला जाणार का आणि हे दोघं सूरजची भेट घेणार का हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे.

## ७ वर्षांच्या मुलाने धनंजय पोवारचं हातावर काढलं चित्र, आई डीपीला फोटो पाठवून म्हणाली....



आपल्या विनोदी शैलीने सोशल मीडियाच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेल्या कोल्हापुरचा ढाण्या वाघ म्हणजे धनंजय पोवार सध्या खूप चर्चेत आहे. 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वात झळकल्यापासून सर्वांचा लाडका डीपी दादा चांगलाच प्रसिद्धीझोतात आला आहे. 'बिग बॉस मराठी'मुळे धनंजयचा चाहता वर्ग वाढला आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना धनंजय चांगलाच पसंतीस पडला आहे.



अलीकडेच धनंजय पोवारने सूरज चव्हाणची खास भेट घेतली. तसंच वैभव चव्हाण आणि इरिनाला देखील तो भेटला. या भेटीदरम्यान जान्हवी किल्लेकर सुद्धा होती. दिवाळीनिमित्ताने 'बिग बॉस मराठी'मध्ये झळकलेल्या या सदस्यांनी खास सूरजचा गावी जाऊन भेट घेतली होती. याचे फोटो आणि व्हिडीओ चांगलेच व्हायरल झाले होते. अशातच धनंजयने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे. ज्यामध्ये एका आईने आपल्या लेकाविषयी धनंजयला सांगितलं आहे. ७ वर्षांचा लेक धनंजयचा इतका मोठा चाहता आहे की, त्याने हातावर डीपीचं चित्र काढलं आहे.

७ वर्षांच्या या मुलाने हातावर काढलेल्या चित्राचा फोटो आणि त्याच्या आईच्या चॅटचे स्क्रीनशॉर्ट धनंजयने शेअर केला आहे. फोटोमध्ये मुलाने धनंजयचं हातावर चित्र काढून वर डीपी लिहिलं आहे. हा फोटो धनंजयला शेअर करत त्याची आई म्हणाली की, हॅलो दादा, माझ्या ७ वर्षांच्या मुलाने असंच तुमचा फोटो पाहून स्वतःच्या हातावर पेनाने चित्र काढलं. मी विचारलं, काय केलं? तर म्हणतो, डीपी दादा. दादा सर्वांवर काय जादू केली? हे पाहून धनंजय भारावून गेला आणि त्याने आभार मानले.

## 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'चा नवीन सीझन येतोय

सोनी मराठी वाहिनीवरील 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या शोने गेल्या काही महिन्यांपासून ब्रेक घेतला होता. त्यामुळे प्रेक्षक हा शो पुन्हा कधी सुरू होईल याची आतुरतेने वाट पाहत होते. याच संदर्भात मालिकेचा नवा प्रोमो सोशल मीडियावर प्रसारित केला होता. कार्यक्रमाची सूत्रसंचालक अभिनेत्री प्राजक्ता माळीने देखील सोशल मीडियावर हास्यजत्रेच्या सेटवरील एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडीओने हास्यरसिकांचं लक्ष वेधलं आहे.
अभिनेत्री प्राजक्ता माळीने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. 'We Are Back!' असं म्हणत व्हिडिओमधून तिने नव्या सीझनच्या शूटिंगला सुरूवात झाल्याची माहिती दिली आहे. या व्हिडिओमध्ये हास्यजत्रेतील कलाकार तसेच शोमध्ये असणारे प्रसाद ओक आणि सई ताम्हणकर दिसत आहेत. येत्या २ डिसेंबरपासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे, असं म्हणत तिने हा व्हिडिओ शूट केल्याचा पाहायला मिळतोय. आता 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम आठवड्यातील तीन दिवस प्रेक्षकांना पाहता येणार असल्याचं सांगताना दिसत आहे.
'महाराष्ट्राची हास्यजत्रा' - कॉमेडीची हॅटट्रिक!" २ डिसेंबरपासून पुन्हा सुरुवात होणार आहे. सोमवार ते बुधवार रात्री ९:३० वाजता हा कार्यक्रम पाहता येईल.

## भुवनेश्वरी आणि चारुलताच्या गोंधळात अक्षराच वेडी ठरणार

'तुला शिकवीन चांगलाच धडा' मालिका प्रेक्षकांच्या आवडत्या मालिकांपैकी एक आहे. वेगळ्या धाटणीचे कथानक आणि कलाकारांचा अभिनय यांमुळे या मालिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसतो. आता मालिकेत नवे वळण आले असल्याचे समोर आलेल्या प्रोमोमधून पाहायला मिळत आहे. झी मराठी वाहिनीने या मालिकेचा प्रोमो सोशल मीडियावर शेअर केला आहे.

झी मराठी वाहिनीने इन्स्टाग्रामच्या अधिकृत अकाउंटवरून तुला शिकवीन चांगलाच धडा या मालिकेचा एक प्रोमो शेअर केला आहे. या प्रोमोमध्ये सगळे जण अक्षराला खोटे ठरवत असल्याचे पाहायला मिळत आहे. प्रोमोच्या सुरुवातीला अक्षरा आणि तिच्या सासू एकमेकींशी बोलत आहेत. अक्षरा चारुलताला म्हणते, "सकाळी तुम्ही कानामध्ये बुगड्या घातल्या होत्या की, नाही, हे सांगा आधी." त्यावर चारुलता म्हणते, "इतक्या मोठ्याने का बोलत आहेस? तितक्यात घरातील सगळे गोळा होतात. अक्षराचा सासरा चारुहास विचारतो, "काय झालं अक्षरा?" त्यावर ती म्हणते, "या मॅडम आपल्याकडे आई म्हणून राहत होत्या इतके दिवस; पण या आई नाहीयेत. या भुवनेश्वरी मॅडम आहेत. चारुलता तिला म्हणते की, तू अशी वेड्यासारखी वागू नकोस. लोक तुला वेडे म्हणतील. अक्षरा म्हणते, मला वेड लागलेलं नाहीये. त्यानंतर सगळे जण तिला बोलत असून,



ती मोठ्याने मी वेडी नाहीये, असे ओरडताना दिसत आहे. पुढे या प्रोमोमध्ये पाहायला मिळते की, दोन नर्स अक्षराला घेऊन दवाखान्यात जात आहेत आणि अक्षरा ओरडत म्हणते, "सोडा मला, मला डॉक्टरकडे जायचं नाहीये. मला वेड लागलं नाहीये."

या मालिकेचा प्रोमो पाहिल्यानंतर नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्याने म्हटले, "शिक्षिका असून सुद्धा हिला शाळा कळतं नाही. लेखक खूपच हुशार आहे", आणखी एका नेटकऱ्याने म्हटले, "आता अति झालं." "काय बावळटपणा आहे हा. शिक्षिका असूनही फोटो काढू शकत नाही. डोक्याचा वापर करीत नाही. मला तर आधीच माहीत होतं की ही भुवनेश्वरी आहे अक्षराला उशिरा कळलं. सगळेच हिला बरे दिसतात", "आता काय तर अक्षराचा चारुहास होणार, तिला वेड्यात काढणार, अक्षरा कोणाला न सांगता शोध घेऊ शकत होती; पण हे काय करून ठेवले आता", अशा प्रकारच्या कमेंट्स करीत नेटकऱ्यांनी आपले मत मांडले आहे.
मालिकेत दाखविल्याप्रमाणे, काही दिवसांपूर्वी चारुहासने भुवनेश्वरीला घराबाहेर काढले होते. अधिपतीसाठी भुवनेश्वरी खूप महत्त्वाची आहे. कारण- तिनेच त्याचा सांभाळ केला आहे. महत्त्वाचे म्हणजे एका अपघातात अधिपतीची खरी आई चारुलताचे निधन झाले आहे, असे कुटुंबातील सर्व जण समजतात. त्यानंतर त्यांच्या आयुष्यात भुवनेश्वरी येते, जी चारुलतासारखी दिसते. आता चारुहासने भुवनेश्वरीला घरातून बाहेर काढल्यानंतर चारुलता अक्षराला सापडते. अक्षरा तिला घरी आणते. चारुहास आणि चारुलता यांच्यातील नाते पूर्वीसारखे व्हावे यासाठी अक्षरा त्यांचे पुन्हा एकदा लग्नदेखील करण्याची तयारी करीत असल्याचे पाहायला मिळाले. मात्र काही दिवसांपासून चारुलताच भुवनेश्वरी असल्याचे तिला वाटत आहे. आता तिने हे सगळ्यांना सांगितल्यानंतर तिला वेडी ठरविण्यात आल्याचे समोर आलेल्या प्रोमोमधून पाहायला मिळत आहे.

आता त्यांच्याबरोबर राहणारी व्यक्ती भुवनेश्वरी आहे की चारुलता हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असून, मालिकेत पुढे काय होणार, याकडे चाहत्यांचे लक्ष वेधले आहे.

## दिनविशेष

### घटना

२००४: यासर अराफत यांच्या मृत्यूपश्चात महमूद अब्बास यांची पॅलेस्टाईन मुक्ती संघटने (PLO) च्या अध्यक्षपदी नियुक्ती...
१९८१: अँटिगा आणि बार्बुडा या देशांचा संयुक्त राष्ट्रांत (United Nations) प्रवेश.
१९७५ : अंगोला देशाला स्वातंत्र्य मिळाले.
१९६२: कुवेत देशाने नवीन संविधान अंगीकारले.
१९४७ : पंढरपूरचे विठ्ठल मंदिर सर्वांना खुले करण्यात आले.
१९४२: दुसरे महायुद्ध नाझी जर्मनीने फ्रान्सचा कब्जा घेतला.
१९३०: आइनस्टाइन रेफ्रिजरेटरच्या शोधासाठी अल्बर्ट आइनस्टाइन आणि लिओ झिझार्ड यांना पेटंट देण्यात आले.
१९२६: अमेरिकेतील रस्त्यांना सख्यांवरून नामकरण करण्यात आले.

### जन्म

१९८५ : रॉबिन उथप्पा - भारतीय क्रिकेटपटू
१९६२: डेमी मूर - अमेरिकन अभिनेत्री, निर्मात्या दिग्दर्शिका, गीतलेखिका आणि मॉडेल
१९४२ : रॉय फ्रेड्रिक्स - वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (निधन: ५ सप्टेंबर २०००)
१९३६: सिंधुताई सपकाळ - मतिमंद मुलांच्या कामायनी संस्थेच्या संस्थापिका, भारतीय समाजसुधारक - पद्मश्री (निधन: ४ जानेवारी २०२२)
१९३६ : माला सिन्हा - हिंदी, नेपाळी व बंगाली चित्रपट अभिनेत्री
१९२६: जॉनी वॉकर - हिंदी चित्रपट विनोदी अभिनेते (निधन: २९ जुलै २००३)
१९२४ : रुसी शेरियर मोदी कसोटीपटू (निधन : १७ मे १९९६)

### मृत्यू

२०२२: सिद्धान्त वीर सुर्यवंशी भारतीय अभिनेते (जन्म: १५ डिसेंबर १९७५)
२००५ : पीटर ड्रकर ऑस्ट्रियन अमेरिकन व्यवस्थापन तज्ञ, लेखक (जन्म: १९ नोव्हेंबर १९०९)
२००५: डॉ. एम. सी. मोदी-नेत्रतज्ज्ञ
२००४: यासर अराफत - पॅलेस्टाइनचे नेते - नोबेल पुरस्कार (जन्म: २४ ऑगस्ट १९२९)
१९९९ : अरविंद मेस्त्री - शिल्पकार
१९९७ : यशवंत दत्त - चित्रपट अभिनेते यशवंत दत्तात्रय महाडिक ऊर्फ
१९९४: कुपल्ली वेंकटप्पागौडा पुट्टप्पा कन्नड लेखक व कवी (जन्म: २९ डिसेंबर १९०४)
१९८४ : मार्टिन ल्यूथर किंग सिनीअर मानवाधिकारांसाठी आजीवन संघर्ष करणारे नेते (जन्म: १९ डिसेंबर १८९९)

## राशी भविष्य

**मेष** - अनावश्यक तणाव आणि चिंता यामुळे तुमचा दिवसभराचा आनंद मावळेल. यावर मात करा अन्यथा समस्या अधिक गंभीर बनेल. नवीन करार लाभदायक वाटण्याची शक्यता आहे, पण तुमच्या अपेक्षेप्रमाणे लाभ होण्याची शक्यता कमी आहे.
**वृषभ** - तुमची शारीरिक प्रकृती सुधारण्यासाठी समतोल आहार घ्या. आज कुणी विपरीत लिंगीच्या मदतीने तुम्हाला व्यवसायात किंवा नोकरीमध्ये आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. अल्प परिचित लोकांशी तुमच्या खाजगी गोष्टी बोलू नका.
**मिथुन** - आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. तुमचे काही जुने आजार आज तुम्हाला चिंतीत करू शकतात. ज्यामुळे तुम्हाला हॉस्पिटल ही जावे लागू शकते आणि तुमचे बरेच धन ही खर्च होऊ शकते.
**कर्क** - तुमच्या दयाळू स्वभावामुळे आज अनेक आनंदाचे क्षण अनुभवाल. पैसे मिळविण्याचा नव्या संधी लाभदायक असतील. आपल्या घरातील वातावरण बदलण्यापूर्वी तुम्हाला सर्वांचा होकार असल्याची खात्री करा.
**सिंह** - तुमच्या दयाळू स्वभावामुळे आज अनेक आनंदाचे क्षण अनुभवाल. पैसे मिळविण्याचा नव्या संधी लाभदायक असतील. आपल्या घरातील वातावरण बदलण्यापूर्वी तुम्हाला सर्वांचा होकार असल्याची खात्री करा.
**कन्या** - तुमचे आवडते स्वप्न प्रत्यक्षात येईल. परंतु तुमचा उत्साह नियंत्रणात ठेवा. कारण खूप आनंदी होणे हे कधी कधी समस्येत टाकू शकते. अतिखर्च, उधळेपणा आणि शंकास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतणे टाळा.
**तूळ** - आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगला दिवस. तुमचे उल्हसित मन तुम्हाला योग्य ती ऊर्जा पुरवेल आणि आपणास आत्मविश्वास मिळवून देईल. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो.
**वृश्चिक** - गरोदर स्त्रियांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. महत्त्वाच्या आर्थिक करारांच्या वेळी आकस्मिक विचार करून निर्णय घेऊ नका. क्वचित भेटीगाठी होणाऱ्या लोकांशी आज संपर्क करण्यासाठी चांगला दिवस.
**धनु** - क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. तुमचा शेजारी आज तुमच्याकडून धन उधार मागण्यास येऊ शकतो. तुम्ही त्यांना धन देण्यापूर्वी त्याची विश्वसनीयता जाणून घ्या अथवा धन हानी होऊ शकते.
**मकर** - घरात काम करताना विशेष काळजी घ्यावी लागेल. घरगुती वस्तुंची बेफिकीरपणे हाताळणी करणे तुम्हाला अडचणीत टाकू शकते. आज धन तुमच्या हातात टिकणार नाही, तुम्हाला धन संचय करण्यात आज खूप समस्यांचा सामना करावा लागू शकतो.
**कुंभ** - तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यास लाभदायक दिवस. आजच्या दिवशी तुम्हाला आपल्या त्या मित्रांपासून सावध राहायचे आहे जे तुमच्याकडून उधार मागतात आणि नंतर परत करत नाही.
**मीन** - आज तुमची प्रकृती चांगली राहील. त्यामुळे तुम्हाला यश मिळेल. परंतु, तुमचे सामर्थ्य संपुष्टात येईल असे काही करण्याचे कटाक्षाने टाळा. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल.

# जनजागृतीवर ५९ कोटींचा खर्च, तरीही सर्वसामान्यांच्या २,८८० कोटींवर डल्लाबँकेत तुमचे पैसे




**नागपूर (नितीन देवळेकर) :** भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) मागील दीड वर्षामध्ये डिजिटल व्यवहार जनजागृतीवर ५९.२९ कोटी रुपये खर्च केले. त्यानंतरही देशभरातील बँकांमध्ये या काळात २ हजार ८८० कोटी १७ लाख रुपयांची सायबर फसवणूक झाली. माहिती अधिकार कायद्यातून हा तपशील समोर आला आहे.

देशभरातील बँकांमध्ये १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ दरम्यान २ लाख ९३ हजार ४८७ सायबर फसवणुकीचे प्रकार घडले. यामध्ये २ हजार ६५ कोटी ६८ लाख रुपये, १ एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ मध्ये १ लाख ४० हजार ९३० प्रकरणांमध्ये ८१४.४९ कोटी रुपये लुबाडले गेले.


१ एप्रिल २०२३ ते १५ सप्टेंबर २०२४ दरम्यान आरबीआयकडून डिजिटल व्यवहार जनजागृतीवर ५९ कोटी २९ लाख ७९ हजार ५४२ रुपयांचा खर्च करण्यात आला. त्यात सेंट्रल बँक डिजिटल चलन जनजागृतीवर ५ कोटी ४७ लाख ६८ हजार ५९८ रुपये, डिजिटल व्यवहार जनजागृतीवर १९ कोटी ११ लाख ७३ हजार ११९ रुपये, डिजिटल व्यवहार जनजागृती सप्ताहावर १७ कोटी २९ लाख २७ हजार ३२० रुपये, आधार संलग्न व्यवहार जनजागृतीवर १७ कोटी ४१ लाख १० हजार ५०५ रुपये खर्च करण्यात आल्याचेही माहिती अधिकारातून समोर आले. माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी याबाबतची माहिती मागितली होती.


# ग्राहक, शेतकरी चिंतेत; कांदा, लसूण महागले तर कापूस, सोयाबीनचे दर पडल्याने नाराजी

**मुंबई (यश सावंत) :** लोकसभा निवडणूक काळात कापूस, सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्याने शेतकऱ्यांमधील रोषाचा फटका अनेक ठिकाणी महायुतीला बसला. तो यावेळी टाळण्यासाठी राज्य सरकारने काही उपाययोजना केल्या, पण शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकलेला नाही. दुसरीकडे, कांद्याचा भाव किरकोळ बाजारात किलोला ८० रुपये तर लसूण ४०० रुपयांवर गेल्याने ग्राहकांवरील बोजा वाढला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर जीवनावश्यक अशा कांद्याचे दर वाढणे आणि कापूस व सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळणे हे सत्ताधारी महायुतीसाठी डोकेदुखी ठरू शकते.

कांद्याचे भाव आणखी महिनाभर चढे राहण्याची शक्यता वर्तविली जाते. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा आणि लसणाची आवक कमी झाल्यामुळे तुटवडा जाणवत आहे. दिवाळीनिमित्त नाशिक परिसरात कांद्याची खरेदी – विक्री आठवडाभर बंद होती. त्यामुळे बाजारात कांद्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांकडील उन्हाळी कांदा जवळपास संपला आहे. खरीप कांद्याची काढणी सुरू असतानाच जोरदार पाऊस झाल्यामुळे कांदा सडला आहे. त्यामुळे खरीप कांद्याच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. खरीप कांद्याची नुकतीच आवक सुरू झाली आहे. बाजारात कांद्याचा तुटवडा असतानाच बांगलादेशाने कांद्यावर लागू केलेला ५० टक्के आयात शुल्क १५ जानेवारीपर्यंत शून्य टक्के केला आहे. त्यामुळे बांगलादेशाला अचानक निर्यात वाढली आहे. या सर्वाचा परिणाम म्हणून पुणे, मुंबईसह राजधानी दिल्लीत दर्जेदार कांद्याचे दर ८० रुपयांवर गेले आहेत. खरीप हंगामातील नुकताच काढलेला, पाण्याचे प्रमाण जास्त असलेला कांदा ६० रुपये किलो दराने विक्री होत आहे. मुंबईत किरकोळ बाजारात कांदा ६० ते ८० रुपये किलो दराने विक्री होत आहे. कांद्याचे दर आणखी महिनाभर तर लसणाचे दर तीन महिने तरी चढे राहण्याची शक्यता वर्तविली जाते.







## सोयाबीन, कापसालाही फटका

गेल्या हंगामात नुकसान झाल्याने कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रति हेक्टर असे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रत्येकी ५ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला खरा, पण यंदा सोयाबीनचा हंगाम सुरू होण्याआधीच सोयाबीनचे भाव बाजारात कमी झाले. केंद्र सरकारने गेल्या सप्टेंबर महिन्यात खाद्य तेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे सोयाबीनला चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. पण, बाजारातील विपरीत परिस्थितीमुळे सोयाबीनचे भाव हमीदराच्या पातळीपर्यंतदेखील पोहचू शकले नाहीत. बाजारात सोयाबीनची आवक वाढल्यानंतर दर अधिकच कोसळले. सोयाबीनचा हमीभाव ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल इतका असताना सध्या ३ हजार ५०० ते ४ हजार १०० रुपये भाव मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.



# कल्याणात महायुती अभेद्यच : उमेदवार विश्वनाथ भोईर आणि भाजप नेते नरेंद्र पवार यांचा एकत्रित प्रचार

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये महायुती ही अभेद्यच असल्याचे आश्वासक असे चित्र आज दिसले. शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, रिपाइं, लहुजी सेना महायतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या खांद्याला खांदा लावत भाजप नेते तथा माजी आमदार नरेंद्र पवार हे निवडणूक प्रचारात सहभागी झाल्याचे दिसून आले. महायुती ही अभेद्यच असल्याचे सूतोवाच महायुती उमेदवार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी केले. तर विश्वनाथ भोईर यांच्या विजयासाठी आपण संपूर्ण ताकद पणाला लावू असा निर्धार यावेळी नरेंद्र पवार यांनी व्यक्त केले. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांनी प्रचाराचा धडाका लावला असून आज संध्याकाळी मोहने परिसरात त्यांची प्रचार रॅली आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये काही दिवसांपूर्वी विश्वनाथ भोईर यांच्याविरोधात निवडणूक रिंगणात उतरलेले आणि नंतर आपली उमेदवारी मागे घेत महायुतीला पाठिंबा देणारे भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनीही आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह सक्रिय सहभाग घेतला होता. नरेंद्र पवार यांनी पक्षादेश शिरसावंद्य मानत अर्ज मागे घेऊन एक आदर्श कार्यकर्ता कसा असतो याचा दाखला सर्वांसमोर घालून दिला आहे. आपण याआधीही सांगितले होते की महायुती अभेद्य आणि अभेद्यच राहणार आहे. शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, रिपाइं, लहुजी सेनेचे प्रमूख नेते कार्यकर्ते इकडे उपस्थित असून या एकीचा प्रत्यय येत आहे.

# त्यागी लोकप्रतिनिधी आणि पदनिष्ठ राजकारणी

**पुणे (अभिजित येरल्लू) -** राजकारणात येतानाच कोणते तरी पद पदरात पाडून घ्यायचे, हा हेतू डोळ्यांसमोर ठेवून सत्तेच्या बाजारात येणाऱ्या राजकारण्यांची सध्या चलती आहे. पद मिळाले, की ते शेवटपर्यंत न सोडता पदोन्नतीचा ध्यास कायम ठेवणाऱ्या या राजकारण्यांच्या मनाविरुद्ध एखादा निर्णय झाला, तरी पद सोडायला तयार नसतात. पक्षांतर बंदी कायदा आल्यानंतर त्यातूनही ते मार्ग काढत आले आहेत. सध्या पक्षनिष्ठेपेक्षा 'पदनिष्ठ' राजकारणी वाढले आहेत. पदांना चिकटलेल्या या राजकारण्यांचा सर्वत्र वावर असताना पक्षासाठी आणि नैतिकतेसाठी पदाचा त्याग करणारे त्यागमूर्ती लोकप्रतिनिधीही पुण्याने पाहिले आहेत. एका पक्षातून दुसऱ्या पक्षात उडी मारणाऱ्या राजकारण्यांचा सुळसुळाट असताना पद क्षुल्लक मानून राष्ट्रीयत्व आणि नैतिकतेला प्राधान्य देणाऱ्या आदर्शवत लोकप्रतिनिधींचा पुण्याला वारसा आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू असताना पुण्यात त्याचे पडसाद उमटत होते. राज्य पुनर्रचनेचा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वी पुण्यात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तेव्हा पक्ष, पदे याचा विचार न करता महापालिकेच्या नगरसेवकांनी एकमुखाने निषेध केला होता. त्यावेळी महापालिकेमध्ये ६५ नगरसेवक होते. नगरसेवकांनी १९ जानेवारी १९५६ रोजी पदाचा राजीनामा देण्याचा निर्धार जाहीर केला. केवळ घोषणा न करता २२ जानेवारी १९५६ रोजी ६५ पैकी ६४ नगरसेवकांनी राजीनामा पुणे महापालिकेचे तत्कालीन प्रशासक आ. श्री. नाईक यांच्याकडे दिला. त्या वेळी पेशवे उद्यानात संयुक्त महाराष्ट्रासाठी जाहीर सभा झाली. ती झाल्यानंतर सर्वांनी सामूहिकरीत्या राजीनामा देत नगरसेवक पदाचा त्याग केला होता. बाबूराव सणस हे तेव्हा पुण्याचे महापौर होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी पदाचा त्याग करणारे आदर्श लोकप्रतिनिधी पुण्याने पाहिले आहेत.



आता सर्वच काळ बदलत चालला आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळविण्यासाठी झालेल्या राजकारणाचा बाजार सर्वांनी पाहिला आहे. आमदार होण्यासाठी पक्षनिष्ठा सोईने बाजूला ठेवत एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाऊन उमेदवारी मिळविलेले अनेक उमेदवार सध्या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. सत्ता, पद आणि खुर्ची हे सर्वस्व मानणाऱ्या या राजकारण्यांची मतदारांना पटविण्यासाठी भाषा ही त्यागाची असते. मतदारांचे, मतदारसंघाचे प्रश्न सोडवून विकासाची गंगा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पूर्वीच्या पक्षाचा त्याग करून नवीन पक्षात दाखल झाल्याचे ते मतदारांच्या मनावर बिंबवित आहेत. मात्र, त्यांचे ध्येय हे पद असते, हे सर्व मतदारांना आता ज्ञात झाले आहे. एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणाऱ्यांची संख्या वाढत चालल्याने खासदार आणि आमदार यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी पक्षांतर बंदी कायदा आणण्यात आला. ५२ वी घटनादुरुस्ती करून १९८५ मध्ये हा पक्षांतरबंदी कायदा आला. तोपर्यंत राजकारणात परिस्थिती अशी होती, की कोणताही खासदार आणि आमदार हा कोणत्याही पक्षात कधीही प्रवेश करू शकत होता. मात्र, त्याचे पद कायम राहत असे. हरियाणामधील आमदार गया लाल यांनी तर एका दिवसात तीन पक्ष बदलले होते. १९६७ मध्ये हा प्रकार झाला होता. तेव्हापासून 'आया राम, गया राम' अशी म्हण राजकारणात प्रचलित झाली. या पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत पक्षांतर केलेल्या लोकप्रतिनिधीचे सदस्यत्व रद्द करण्याचे अधिकार पीठासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पक्षाचा आदेश म्हणजेच 'व्हिप' मानला नाही, तर सदस्यत्व रद्द होते. तसेच पक्षाचा राजीनामा दिल्यास त्या लोकप्रतिनिधीचे सदस्यत्व रद्द होते. मात्र, कोणत्याही पक्षाचे दोन तृतीयांश खासदार किंवा आमदार दुसऱ्या पक्षात जात असतील, तर त्यांचे सदस्यत्व रद्द होत नाही.

## SPORT


# Skipper Rizwan as Pakistan capture first ODI series win in Australia after 22 years

**New Delhi -** Following Pakistan's series win over Australia with a victory in third ODI, 'Men in Green' skipper Mohammed Rizwan said that the win is a special moment for him and lauded his bowlers for their performances.

Rizwan's white-ball captaincy tenure was off to a dream start as another masterclass from pacers helped Pakistan secure a series win over Australia on Aussie soil for the first time since 2002, with Haris Rauf, Shaheen Shah Afridi and opener Saim Ayub being the standout performers.

In the post-match presentation, Rizwan revealed that he is open to suggestions from everyone, which plays its part in the team's success. He also lauded openers Ayub and Abdullah Shafique for their performances.

"A special moment for me (the series win), the nation will be very happy today, we did not perform as per expectations in the last couple of years. I am the captain only for the toss and presentations - everyone gives me suggestions on the field, the batting group and the bowling group. All the credit to the bowlers, (beating) Australia in Australia is not easy, the conditions suit their style of playing, but the bowlers were outstanding. Also, credit to the two openers, they made the chases easy. The people back home are always behind us and I want to dedicate this victory to them," Rizwan said.




Pakistan have secured the three-match ODI series 2-1 in a convincing fashion, with two big wins after a loss in the first ODI, which was a closely fought affair.

Coming to the match, Pakistan won the toss and opted to bowl first. Aussie batters once again struggled against the pace of Shaheen (3/32), Naseem Shah (3/54) and Rauf (2/24). There were no big partnerships as only Sean Abbott (30 in 41 balls, with two fours and a six) and Matthew Short (22 in 30 balls, with one boundary) touched the 20-run mark. Australia was skittled out for a sorry 140 runs in 31.5 overs.

In the run-chase, Ayub (42 in 52 balls, with four boundaries and a six) and Shafique (37 in 53 balls, with a four and a six) put on a 84-run opening stand. Later, the star duo of Babar Azam (28* in 30 balls, with four boundaries) and Rizwan (30* in 27 balls, with one four and two sixes) finished the game with eight wickets and almost 23 overs in hand.

Lance Morris picked two wickets for Australia, ending with 2/24 in six overs.

Rauf walked away with the 'Player of the Match' award for his spell and the 'Player of the Series' award as well for taking 10 wickets in the series, including a fifer.

# Gautam Gambhir to address media before Team India's departure for Border-Gavaskar Trophy

**NEW DELHI :** Team India head coach Gautam Gambhir is set to address the media in a pre-departure press conference ahead of the highly anticipated five-match Border-Gavaskar Trophy against Australia.



Scheduled for Monday at 9:00 AM, the briefing will take place at Ballroom 4, ITC Maratha in Mumbai.

This interaction provides an opportunity for Gambhir to discuss team preparations, key strategies, and expectations for the challenging Test series.

The Indian contingent will travel to Australia in two separate batches, departing on November 10 and 11. The series begins with the first Test in Perth on November 22.

A highlight of the tour will be the pink-ball, day-night Test at Adelaide Oval, scheduled from December 6 to 10.

The third Test will take place at The Gabba in Brisbane from December 14 to 18, followed by the traditional Boxing Day Test at Melbourne Cricket Ground from December 26 to 30.

The fifth and final Test is slated for January 3 in Sydney.

India previously clinched consecutive Test series wins in Australia, first under Virat Kohli's leadership in 2018-19 and then under Ajinkya Rahane in 2020-21.

Now, with Rohit at the helm, they will be aiming for a historic third straight series win on Australian soil

# Nasty blow from Pakistan pacer rules Australia batsman out of entire series

**NEW DELHI:** Australian all-rounder Cooper Connolly will miss the upcoming T20I series against Pakistan due to a fractured left hand sustained when Mohammad Hasnain struck him during the final ODI in Perth on Sunday.

The incident occurred in the 17th over when Connolly attempted a pull shot and received a blow to his glove on the second delivery.

Although he faced another ball, he soon recognised discomfort. Following a brief medical assessment, he departed the field for scans that confirmed the injury's severity.

Cricket Australia issued a statement on Connolly's injury.

"Cooper Connolly has a fractured fourth metacarpal on his left hand, ruling him out of the Australian men's T20 side to play Pakistan. He was struck on the hand by Mohammad Hasnain while batting in the final ODI against Pakistan in Perth," Cricket Australia said.




"Connolly will consult a specialist in Perth tomorrow. A replacement player will be named in due course," it said.

Prior to this incident, Connolly participated in the Australia A matches against India A, appearing in the opening fixture at Mackay where he scored 37 in the first innings, before joining the ODI squad.

Throughout his international career, Connolly has represented Australia in two T20Is and two ODIs.

# सोलापूर जिल्हा बँक घोटाळ्याची ३२ तत्कालीन संचालकांवर जबाबदारी

## ११०३ कोटी रुपये गैरव्यवहार प्रकरण, ऐन निवडणुकीत निर्णयाने खळबळ

● **सोलापूर, सचिन कदम :**



अनुत्पादक कर्जामुळे (एनपीए) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला झालेल्या ११०३ कोटी रुपयांच्या नुकसानीची जबाबदारी बँकेच्या तत्कालीन ३२ संचालकांसह दोन अधिकारी आणि एका सनदी लेखापालावर निश्चित करण्यात आली आहे. निश्चित केलेल्या जबाबदारीप्रमाणे संपूर्ण रक्मेची वसुली सर्व दोषींकडून करावी, असा आदेश चौकशी अधिकारी डॉ. किशोर तोष्णीवाल यांनी दिला आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच हा आदेश निघाल्यामुळे सोलापूरच्या राजकीय क्षेत्रात खळबळ माजली आहे.

दोषी ठरविण्यात आलेल्या तत्कालीन संचालकांमध्ये माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, दिलीप सोपल, ज्येष्ठ आमदार बबनराव शिंदे, त्यांचे बंधू आमदार संजय शिंदे, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, दिवंगत माजी मंत्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार राजन पाटील-अनगरकर, दिलीप माने, जयवंत जगताप आदींचा प्रामुख्याने समावेश आहे. यातील दिलीप सोपल (शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, बार्शी), आमदार संजय शिंदे (अपक्ष, करमाळा), दीपक साळुंखे-पाटील (शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, सांगोला) ही मंडळी विधानसभा निवडणुकीतील बलाढ्य उमेदवार आहेत. चौकशीनंतर निकाल देण्यास ६० दिवसांचा अवधी असताना विधानसभा निवडणुकीतच हा निकाल देण्यात आल्यामुळे त्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले जात आहे. कारण मालमत्तेपेक्षा जास्त प्रमाणात कर्जवाटप, कर्जवसुलीअभावी अनुत्पादक कर्जामध्ये झालेली वाढ, अनियमितता यामुळे रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ २०१८ साली बरखास्त करण्यात आले होते. तेव्हापासून आजतागायत बँकेत सहकार खात्याकडून प्रशासकीय कारभार सुरू आहे.

दरम्यान, बँकेच्या आर्थिक नुकसानीची आणि तत्कालीन संचालक मंडळाची चौकशी करण्यासाठी राज्याचे सहकार विभागाचे निवृत्त अप्पर निबंधक डॉ. किशोर तोष्णीवाल यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. सहकार कायदा १९६० च्या कलम ८८ नुसार डॉ. तोष्णीवाल यांनी चौकशी केली. यात सहा वर्षांनंतर चौकशीअंती बँकेच्या संबंधित तत्कालीन संचालकांसह अधिकारी आणि सनदी लेखापालावर नुकसानीबद्दल जबाबदारी निश्चित करण्यात आली.

# एटीएम फोडून रोकड चोरणारी हरयाणातील टोळी गजाआड, स्थानिक गुन्हे शाखा आणि शिरूर पोलिसांची कामगिरी



● **पुणे, अभिजीत येरल्लू :**

एटीएम गॅस कटरने कापून रोकड चोरण्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्य टोळीला स्थानिक गुन्हे शाखा आणि शिरूर पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून कंटेनर, एटीएम कापण्यासाठी लागणारे गॅस कटर, गॅस टाकी, कटावणी, पहार, दोरी असा १५ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कुतूबुद्दीन अख्तर हुसेन (वय ३१, राजस्थान), यसीन हारून खान (वय ३२) राहुल रशीद खान (वय ३२, दोघे रा. हरयाणा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपीची नावे आहेत. हरयाणा आणि राजस्थानमध्ये एटीएम फोडून रोकड चोरी करणारी टोळी पुणे जिल्हयात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्याअनुषंगाने पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला. चोरट्यांची टोळी पुणे-नगर रस्त्यावरील सरहदवाडी गावाजवळ एका ढाब्याच्या परिसरात थांबल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मदतीने कारवाई केली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तिघांना ताब्यात घेतले.

पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले, हनुमंत गिरी, तुषार पंदारे, जनार्धन शेळके, संजू जाधव, प्रफुल्ल भगत, विजय शिंदे, नीरज पिसाळ, नितेश थोरात, निखिल रावडे यांनी ही कामगिरी केली. चोरट्यांच्या टोळीने राज्यात कोठे एटीएम फोडून रोकड चोरीचे गुन्हे केले आहेत का ? , यादृष्टीने तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# नोकरभरतीचा मुद्दा प्रचारात आणणारा काँग्रेस पक्ष तोंडघशी, चंद्रपूर जिल्हा बँकेतील नोकरभरतीला स्थगिती

● **चंद्रपूर, नितीन देवळेकर :**




ओबीसी एस.सी, एस.टी. व एन.टी. उमेदवारांना आरक्षण लागू असताना त्यांचे आरक्षण रद्द करून ३६० पदांसाठी राबवण्यात येणारी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोकरभरती प्रक्रिया विधानसभा निवडणूक आदर्श आचारसंहितेमुळे स्थगित करण्यात आली. त्यामुळे काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या बँकेतील संचालक मंडळाला जबर धक्का बसला. आता ही भरतीप्रक्रिया आचार संहितेनंतरच राबविण्यात येणार आहे. विधानसभा निवडणूक प्रचारात संचालक मंडळाकडून नोकरभरती मुद्याचा वापर केला जात होता, अशाही तक्रारी झाल्या आहेत.

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत येत्या १५ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत ३६० पदाकरिता नोकरभरती प्रक्रिया राबविण्यात येणार होती. या भरती प्रक्रियेसाठी तीन दिवसांत परीक्षा नियोजित होती. अगदी सुरुवातीला उच्च न्यायालयात बँकेने दिलेल्या शपथपत्रात भरती प्रक्रिया टी.सी. एस. कंपनीमार्फत पारदर्शकपणे राबवली जाईल, असे नमूद होते. मात्र, बँकेचे अध्यक्ष संतोषसिंग रावत व संचालक मंडळाने ठराव घेऊन अन्य आयटी कंपनीला नोकर भरतीच्या परीक्षेचे काम दिले. तसेच ३६० पदांच्या भरतीत ओबीसी, एससी, एसटी व एनटी विद्यार्थ्यांना आरक्षण नाकारण्यात आले. त्यामुळे बेरोजगारांमध्ये तीव्र रोष होता. याप्रकरणी अनेकांनी सहकार आयुक्त, पुणे कार्यालयाकडे असंख्य तक्रारी केल्या. तसेच विधानसभा निवडणूक आचारसंहिता काळात बँकेची नोकर भरती प्रक्रिया राबवणे गैर आहे, याला स्थगिती द्यावी, अशीही मागणी सहकार आयुक्तांकडे करण्यात आली.

काँग्रेसचे संचालक मंडळ विधानसभा निवडणुकीत या नोकर भरतीचा प्रचार करीत होते. याप्रकरणी असंख्य तक्रारी सहकार आयुक्त, पुणे कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यावरून या भरती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली. आदर्श आचारसंहिता कालावधीत नोकरभzरती पक्रिया राबवू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर कल्याणकर यांना दिले आहे.

# पाकिस्तानात आत्मघातकी बॉम्बस्फोट; २७ ठार, ६२ जखमी

● **नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**



पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील रेल्वे स्थानकावर शनिवारी झालेल्या आत्मघातकी बॉम्बस्फोटात १४ सुरक्षा कर्मचाऱ्यांसह किमान २७ लोक ठार आणि ६२ जण जखमी झाले. पेशावरसाठी निघालेली जाफर एक्स्प्रेस पकडण्यासाठी प्रवासी प्रांतीय राजधानी असलेल्या क्वेटाच्या रेल्वे स्थानकात जमले होते, त्या वेळीच हा बॉम्बस्फोट झाला.

हल्लेखोर आत्मघातकी हल्ला करण्याच्या उद्देशाने स्थानकात घुसले. त्यांना रोखणे कठीण होते, असे क्वेटा विभागाचे आयुक्त हमजा शफकत यांनी सांगितले. दरम्यान, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असल्याची माहिती या वेळी पोलीस अधीक्षक (मोहीम) मुहम्मद बलोच यांनी दिली आहे. परिसराची सुरक्षा वाढवली असून जखमी आणि मृतांना सरकारी रुग्णालयात दाखल केल्याचे प्रांतीय सरकारचे प्रवक्ते शाहीद रिंद यांनी सांगितले. बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या बलूच फुटीरतावादी गटाला दहशतवादी संघटना म्हणून घोषित करण्यात आले आहे.

# लाडकी बहीण योजनेवरून खासदार धनंजय महाडिक यांचे वादग्रस्त विधान

● **कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :**

लाडकी बहिणी योजनेचे १५०० रुपये घेणाऱ्या महिला काँग्रेसच्या रॅली दिसल्या तर त्यांचे फोटो काढून घ्या, असे वादग्रस्त विधान भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांनी शनिवारी रात्री येथे एका सभेत केले. त्यांच्या या विधानावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. खासदार प्रणिती शिंदे यांनी या विधानावरून खासदार धनंजय महाडिक यांनी राज्यातील महिलांची माफी मागावी अशी मागणी केली आहे. तर काँग्रेसचे गटनेते विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांनी ही तर धनंजय महाडिक यांची मुजोरी, अशा शब्दात हल्ला चढवलेला आहे.

कोल्हापूर राज्याच्या विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण हा प्रचाराचा केंद्रबिंदू बनला आहे. कोल्हापुरात झालेल्या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेत १५०० रुपये ऐवजी दरमहा २१०९ रुपये देण्याची घोषणा केली आहे..तर महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यात महालक्ष्मी योजनेअंतर्गत तीन हजार रुपये देण्याची जाहीर करण्यात आले आहे. या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये टीकाटिपणी सुरू आहे.

तर या मुद्द्याला स्पर्श करताना आज खासदार धनंजय महाडिक यांनी कोल्हापुरात वादग्रस्त विधान केले. ते म्हणाले,लाडकी बहिणी योजनेचे १५०० रुपये घेणाऱ्या महिला काँग्रेसच्या रॅली दिसल्या तर त्यांचे फोटो काढून घ्या. त्यांची नावे लिहून ठेवा.आपल्या शासनाचे घ्यायचे आणि गायचं त्यांचं असं चालणार नाही. त्यांचे फोटो आमच्याकडे द्या. त्यांची व्यवस्था करतो. कोण जास्त बोलायला लागली किंवा दारात आली तर तिला फॉर्म द्यायचा आणि यावर सही कर म्हणायचे. आम्ही पैसे लगेच बंद करतो, असा इशाराही महाडिक यांनी दिला.

दरम्यान, महाडिक यांच्या विधानावर कोल्हापुरात बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी टीका केली आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. येथे महिलांचा सन्मान केला जातो. परंतु धनंजय महाडिक यांनी महिलांचा अवमान केला आहे. त्यांनी राज्यातील समस्त महिलांची माफी मागितली पाहिजे. यातून भाजपची महिलांवकडे पाहण्याचे नेमकी प्रवृत्ती काय हेच दिसले आहे..त्यांच्या या विधानाचा निषेध नोंदवते, असे शिंदे यांनी म्हटले आहे.

तर सतेज पाटील यांनी फेसबुक वर एक पोस्ट शेअर करीत धनंजय महाडिक यांची ही मुजोरी असल्याच्या हल्ला चढवला आहे. 'भाजप खासदार धनंजय महाडिक यांची मुजोरी.महिलांना जाहीर सभेत धमकी .काँग्रेसच्या रॅली, सभेत महिला दिसल्या तर त्यांचे फोटो काढा आणि आमच्याकडे द्या.आम्ही व्यवस्था करतो त्यांची !,' असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.




या प्रकरणी सतेज पाटील यांनी आणखी सविस्तर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या राज्यात विरोधकांच्या सुनेलाही साडी चोळी देऊन परत पाठवण्याचा इतिहास छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेला आहे. धनंजय महाडिक हे भाजपचे खासदार आहेत. त्यांनी उत्तरच्या पोटनिवडणुकीतही जयश्री जाधव यांचा अपमान केला होता. आता पुन्हा एकदा त्यांनी असे वक्तव्य केले आहे. महाडिक यांची पार्श्वभूमी कोल्हापूर जिल्ह्याला माहीत आहे. गुंडगिरीची भाषा अन या भाषेतून दहशत पसरवणे हा एकमेव अजेंडा या महाडिक कंपनीचा राहिला आहे. परंतु कोल्हापूरची जनता हुशार आहे. असल्या धमकीला आमच्या माता भगिनी घाबरणार नाहीत. घरातले पैसे दिल्यासारखे ते बोलत आहेत. छाती बडवून घ्या असे ते म्हणाले, म्हणजे यांना सुरक्षित महिला नको आहेत. यांच्या मनात महिलांना सुरक्षा द्यायची नाही. त्यांच्या या वक्त्याचा राज्यातील काँग्रेसजण निषेध करत आहे. महाडिक परजिल्ह्यातील आहेत त्यामुळे शाहू, फुले, आंबेडकर व ताराराणीचा वारसा ते सांगू शकत नाहीत. त्यांना या मातीचा नेमका काय गुण आहे हे माहीत नाही. त्यांच्या या वक्त्याचा जाहीर निषेध करतोअसेकाँग्रेस विधिमंडळ गटनेते सतेज पाटील यांनी सांगितले.

दरम्यान हे विधान अंगलट येऊ लागलं खासदार धनंजय महाडिक यांनी माझ्या वक्तव्याने कुठल्याही माता भगिनींचे मन दुखावले असेल, तर त्यांची माफी मागतो, असे म्हणत पडदा टाकला आहे. माझे हे वक्तव्य कुठल्याही माता भगिनीचा अपमान करण्यासाठी मुळीच नव्हते. तर निवडणूक काळात राजकीय प्रचार करताना, विरोधी पक्षाच्या खोट्या प्रचाराला बळी पडणाऱ्या महिलांना, लाडकी बहीण योजना ही फक्त महायुती सरकार मुळेच यशस्वी झाली असल्याचे ठाम पणे नमूद करताना, चुकून आलेली प्रतिक्रिया आहे.

मी माझ्या वैयक्तिक , राजकीय आयुष्यात महिलांचा नेहमीच सन्मान करत आलेलो आहे. मी आणि माझ्या पत्नी मार्फत गेली१६ वर्षे भागीरथी महिला संस्थेमार्फत महिलांच्या आत्मनिर्भरते साठी नेहमीच सकारात्मक काम करत आलो आहे आणि ह्या पुढे देखील करत राहीन. महिलांचा सन्मान आणि सशक्तीकरण बाबत, आम्ही नेहमीच प्रयत्नशील आहोत. तरीही माझ्या वक्तव्याने मन दुखावलेल्या माझ्या भगिनी मला मोठ्या मनाने माफ करतील, अशी आई अंबाबाईच्या चरणी मी प्रार्थना करतो, असे खासदार धनंजय महाडीक यांनी म्हटले आहे.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोळसेवाडी पोलिसांची प्रतिबंधात्मक कारवाई

● **कल्याण, आकाश कांबळे :**



निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोळसेवाडी पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. संशयितांवर प्रतिबंधात्मक कारवाया करत आहे, ज्यामुळे निवडणुकीला शांततेत पार पडण्यास मदत होणार असल्याचे कोळसेवाडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कदम यांनी सांगितले. कोळसेवाडी पोलिस स्टेशन अंतर्गत कल्याण पूर्व आणि कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघ येतो. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुन्हेगारी आणि गुन्हेगारी लोकं, गुन्हेगारांची कामं यावर प्रतिबंध घालण्यासाठी कोळसेवाडी पोलिसांतर्फे मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये १६ जणांच्या विरुद्ध दारूबंदीच्या केसेस करण्यात आल्या असून ३९ हजार ५२० रुपयांची २३६ लीटर दारू जप्त करण्यात आली आहे. त्याबरोबरच नाऱ्कोटिक्स अ‍ॅक्ट अंतर्गत तीन केस करण्यात आल्या असून तीन जणांना अटक करण्यात आली आहे. स्वता जवळ नाऱ्कोटिक्स ठेवणाऱ्या दोन जणांना अटक करत त्यांच्याकडून १७ हजार ६०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. ३५४ ग्राम गांजा जप्त केला आहे. आर्म अ‍ॅक्ट अंतर्गत हत्यार बाळगणाऱ्या ५ लोकांवर कारवाई करण्यात आली असून ५ हत्यारे जप्त करत त्यांच्यावर कारवाई केली आहे. जुगार खेळणाऱ्या तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

# भाजपाच्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचं आश्वासन , शेतकऱ्यांना कर्जमाफीसह 'या' घोषणा

● **मुंबई, विशाल कारंडे :**




महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. पुढच्या दहा दिवसात राज्य निवडणुकीला सामोरं जाणार आहे. दरम्यान भाजपाने त्यांचा जाहीरनामा प्रकाशित केला आहे. लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देणार असं यात जाहीर करण्यात आलं आहे. तसंच इतरही घोषणा करण्यात आल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार पियुष गोयल तसंच चंद्रशेखर बावनकुळे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

भाजपाच्या जाहीरनाम्यात कुठल्या घोषणा?

लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला रु. १५०० वरुन रु. २१०० देण्यात येतील तसेच या योजनेचे औचित्य साधून महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल. महिला सुरक्षेसाठी २५००० महिलांचा पोलिस दलात समावेश करण्यात येईल.

शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला रु. १२,००० वरून रु. १५,०००, तसेच एमएसपीशी समन्वय साधत २० टक्क्यांपर्यंत भावांतर योजना

प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्यात येईल.

वृद्ध पेंशन धारकांना महिन्याला रु. १५०० वरुन रु. २१०० देण्यात येतील जेणेकरून संपूर्ण महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांना अधिक आर्थिक सुरक्षा आणि सन्मान मिळेल.

महाराष्ट्रातील सर्व कुटुंबांना बाजारातील उतार-चढावांपासून सुरक्षित करण्यासाठी राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यात येतील.

येणाऱ्या काळात २५ लाख रोजगार निर्मिती तसेच महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना रु. १०,००० विद्यावेतन देण्यात येईल.

जाहीरनाम्यातील ठळक मुद्दे काय आहेत?

१० राज्यातील ग्रामीण भागात ४५,००० गावांत पांधण रस्ते बांधण्यात येतील.

अंगणवाडी आणि आशा सेविकांची आर्थिक सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी महिन्याला रु१५,००० वेतन आणि विमा संरक्षण ( BJP Manifesto ) देण्यात येईल.

वीज बिलात ३०% कपात करुन सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देण्यात येईल.

सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत' व्हिजन महाराष्ट्र @ २०२९ सादर करण्यात येईल.

देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर ठेवण्याचं आमचं धोरण आहे. फिनटेक आणि एआयचं हब म्हणून महाराष्ट्र झालेला दिसेल. या दोन्हीचं सर्वात मोठं केंद्र महाराष्ट्र असेल. तसंच या क्षेत्रात नोकरीच्याही अनेक संधी आहेत, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंआहे. २०२७ पर्यंत ५० लाख लखपती दीदी तयार करण्याचा आमचा संकल्प आहे. असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.